## शेअर बाजार वधारला

**मुंबई** : भारत-अमेरिका व्यापार करार झाल्यानंतर शेअर बाजारातील मरगळ आणि दबाव दूर झाला आणि गेल्या आठवड्यात दोन दिवस बाजाराने चांगली तेजी दाखवली. मात्र, त्यानंतर आयटी सेक्टरवरील दबाव वाढला आणि पुन्हा बाजारात मंदी जाणवत होती. आता आठवड्याच्या पहिल्याच दिवशी गुंतवणुकदारांनी चांगलाच उत्साह दाखवला असून, त्यामुळे शेअर बाजार चांगलाच तेजीत आला आहे. सोमवारी शेअर बाजारात व्यवहाराला सुरुवात होताच सेन्सेक्सने ८४,००० चा टप्पा ओलांडला, तर निफ्टी २६,००० च्या जवळ पोहोचला.

रायगड, मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

## सोन्या-चांदीच्या दरात पुन्हा वाढ

**मुंबई** : गेल्या आठवड्यात सोने-चांदीच्या दराने ग्राहकांना दिलासा मिळाला होता. मात्र, शुक्रवारपासून सोने-चांदीचे दर वाढण्यास सुरुवात झाली होती. सोमवारी वायदे बाजार सुरू होताच सोने आणि चांदीच्या किमतीतील घसरण थांबली. बाजार उघडताच दोन्ही धातूंमध्ये तेजी दिसून आली. मात्र, अजूनही सोने-चांदी त्यांच्या उच्चांकापासून स्वस्त असल्याने खरदी करण्यासाठी अजूनही चांगली संधी असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. वायदे बाजाराला सोमवारी सुरुवात होताच चांदी १२,००० रुपयांनी, तर सोन्याच्या दरातही २,१०० रुपयांपेक्षा जास्त वाढ झाली.

## वे|ध|क

### शरद पवारांची प्रकृती स्थिर

**पुणे** : ज्येष्ठ नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (श.प.) अध्यक्ष शरद पवार यांच्या प्रकृतीमध्ये बिघाड झाल्याने त्यांना बारामतीहून पुण्याला आणण्यात आलेलं होतं. छातीत कफ आणि खोकल्याचा त्रास त्यांना होत होता. पुण्यातल्या रुबी हॉल क्लिनिकच्या डॉक्टरांनी त्यांची प्रकृती स्थिर असल्याचं सांगितलं आहे. शरद पवारांवर उपचार करणारे डॉ. अभिजित लोढा (फिजिशियन) यांनी सांगितलं की, काही दिवसांपासून शरद पवार यांना हा त्रास जाणवत असावा. शारीरिक परिश्रम झाल्यामुळे त्यांना काहीसा थकवा जाणवत होता आणि खोकलासुद्धा होता. ते सध्या एका खासगी रुममध्ये आहेत, आयसीयूमध्ये नाहीत. काही चाचण्या आम्ही केल्या आहेत त्याचे अहवाल पुढील दोन ते तीन तासांत येतील.

### नेमबाजाचा मृत्यू

**पालघर** : राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धा आणि आंतरराष्ट्रीय कनिष्ठ नेमबाजी स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केलेल्या २७ वर्षीय संभाजी पाटील याचा कार अपघातात मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर दुर्वेस गावाजवळ हेरिटेज डेअरी समोर फॉर्चूनर आणि हायवा ट्रकमध्ये झालेल्या भीषण अपघातात त्याचा मृत्यू झाला आहे. हा अपघात सोमवारी (दि.९) सकाळी दहा वाजताच्या सुमारास घडल्याची शक्यता आहे. अपघातात पाटील याचा तेवीस वर्षीय मित्र यश चौधरी जखमी झाला आहे. संभाजी पाटील हा बालेवाडी क्रीडा संकुलात क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत होता. ही घटना घडल्यानंतर महामार्ग पोलीस आणि मनोर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

### लाडक्या बहिणींना सरकारचा दिलासा

**मुंबई** : महाराष्ट्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत लाभ घेणाऱ्या महिलांसाठी ई-केवायसी दुरुस्त करण्याची शेवटची तारीख राज्य सरकारने ३१ मार्च २०२६ निश्चित केली आहे. ऑनलाइन पडताळणी प्रक्रियेदरम्यान त्रुटींमुळे लाभ मिळविण्यात अडचणी येत असलेल्या महिलांसाठी ही शेवटची संधी असल्याचे महाराष्ट्राच्या महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी स्पष्ट केले आहे. ई-केवायसी प्रक्रियेदरम्यान अनेक पात्र महिलांनी पोर्टलवर चुकीचे पर्याय निवडल्याचे सरकारच्या लक्षात आले आहे. चुकीची दुरुस्ती करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

### भारताच्या जीडीपीत होणार वाढ

**नवी दिल्ली** : आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये भारताचे सकल राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी) ६.४ टक्क्यांनी वाढेल. अमेरिका, चीन, फ्रान्स, ब्रिटन आणि जर्मनीसह विविध देशांचा समावेश असलेल्या जी-२० समूहात भारताचा वाढीचा वेग सर्वाधिक असेल, असा अंदाज मूडीज् रेटिंग एजन्सीने वर्तविला आहे. बँकिंग प्रणाली पाहणी अहवालानुसार, बँकांच्या मालमत्तेची गुणवता चांगली राहील. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांवर म्हटले आहे की, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये (एमएसएमई) काही प्रमाणात तणाव असला, तरी बँकांच्या मालमत्तेची गुणवत्ता लवचिक राहील. असे असले, तरी कर्जाचे नुकसान सहन करण्यासाठी बँकांकडे पुरेसा राखीव निधी असल्याचे अहवालात म्हटले आहे.

# धनशक्तीचा विजय!

## भाजप, राष्ट्रवादी, शिंदे गट बहुमतापासून दूर

## सत्तेसाठी तडजोडी, सौदेबाजी अटळ

### जि.प. ५९ जागांसाठी १७३, तर पं.स. ११८ जागांसाठी ३२९ उमेदवार होते रिंगणात

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत अखेर पैशाच्या जोरासमोर जनाधार कमी पडल्याचे चित्र स्पष्ट झाले. या निवडणुकीत कोणत्याच पक्षाला जनतेने पूर्ण जनाधार दिलेला नाही. विशेष म्हणजे, सर्वाधिक जागा मिळवूनही शिंदे गट बहुमतापासून दूर आहे; भाजप आणि राष्ट्रवादीही अपेक्षित संख्येपर्यंत पोहोचू शकलेले नाहीत. म्हणजेच सत्ता स्थापनेसाठी आता तडजोडी, सौदेबाजी आणि पडद्यामागील हालचाली अटळ ठरणार आहेत.

५९ जिल्हा परिषद आणि ११८ पंचायत समिती जागांसाठी झालेल्या या निवडणुकीत 'जनशक्ती विरुद्ध धनशक्ती' अशी रंगलेली लढत शेवटी धनशक्तीच्या बाजूने झुकल्याचे निकालातून स्पष्ट झाले. रायगड जिल्हा परिषद निवडणुकीत कोणत्याच पक्षाला जनतेने पूर्ण अधिकार दिलेला नाही. ५९ जागांपैकी शिवसेना २१, भाजप १५, राष्ट्रवादी १६, उबाठा ५ आणि काँग्रेस २ जागांवर समाधान मानावे लागले आहे. मतदारांनी सत्ता कुणालाही पूर्णपणे सोपवली नाही. प्रदीर्घ कालावधीनंतर पार पडलेल्या या निवडणुकीत प्रचार, आरोप-प्रत्यारोप, शक्तीप्रदर्शन यांचा धुरळा उडाला होता. मात्र, मतमोजणीअंती मतदारांनी कोणाच्या बाजूने कौल दिला, हे दुपारपर्यंत स्पष्ट झाले असून, जनशक्तीच्या समोर धनशक्तीचा विजय झाल्याचे समोर आले आहे. •> पान २ वर



### सत्तेसाठी शिंदे गट कोणाचे पाय धरणार?

जिल्ह्यात सर्वाधिक जागा जिंकूनही शिंदे गटाला विरोधी बाकावर बसावे लागण्याची चिन्हे आहेत. भाजप १५ आणि राष्ट्रवादी १६ दोन्ही पक्षांच्या जागांची बेरीज ३१ होत असल्याने, बहुमतासाठी लागणारा ३० चा आकडा हे दोन्ही पक्ष सहज पार करीत आहेत. त्यामुळे महायुतीमध्ये असूनही शिंदे गटाला विरोधात ठेवण्याच्या हालचाली सुरू आहेत. कारण, निवडणुकीपूर्वी 'एकला चलो रे'च्या भूमिकेतून मतदारांसमोर गेलेल्या शिंदे गटाला बहुमत सिद्ध करता आलेले नाही. त्यामुळे आता जिल्हा परिषदेत सत्ता स्थापनेसाठी शिंदे गट कोणाचे पाय धरणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत शिंदे गटाचे २१ उमेदवार निवडून आले आहेत. मात्र, सत्तेच्या समीकरणात हा आकडा पुरेसा ठरणार नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. शिंदे गटाचे उमेदवार भाजप व राष्ट्रवादीपेक्षा अधिक संख्येने विजयी झाले असले तरी सत्ता स्थापनेच्या वेळी त्यांना मोठी कसरत करावी लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

निवडणुकीपूर्वी शिंदे गटाने भाजप व राष्ट्रवादीला बाजूला सारत जिल्हा परिषद निवडणूक स्वतंत्रपणे लढविण्याचा सूर लावला होता. प्रचारादरम्यान एकमेकांविरोधात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या. शिंदे गटाने राष्ट्रवादीसह भाजपलादेखील लक्ष्य केले होते. मात्र, निकालानंतरचे चित्र वेगळे दिसू लागले आहे. शिंदे गटाला सत्तेत सहभागी व्हायचे असल्यास राष्ट्रवादी व भाजपची साथ आवश्यक ठरणार आहे.

### राज्यभरात निकाल जाहीर

**मुंबई** : राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समितींसाठी ७ फेब्रुवारीला मतदान पार पडले होते. १२ पैकी ७ जिल्हा परिषदांवर भाजपचा झेंडा फडकला आहे. तर २ ठिकाणी शिवसेना आणि २ ठिकाणी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचा विजय झाला आहे. तर एका जिल्हा परिषदेत शरद पवारांच्या राष्ट्रवादीने विजय मिळवला आहे. यात सिंधुदुर्ग, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर, सातारा आणि सोलापूर या जिल्हा परिषदांचा समावेश आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने रायगड आणि रत्नागिरी जिल्हा परिषदेमध्ये सर्वाधिक जागा जिंकल्या आहे

## खारेपाटात कमळाला नाकारले

### भाजपच्या चित्रा पाटील, सवाई पाटील यांचा दारुण पराभव

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

खारेपाटातील मतदारांनी यावेळी कमळाला केवळ नाकारले नाही, तर ते अक्षरशः उखडून फेकल्याचे निकालातून ठळकपणे समोर आले. निवडणुकीपूर्वी भाजपने आंबेपूर आणि शहापूर जिल्हा परिषद मतदारसंघात मोठी ताकद लावत कमळ फुलविण्याचा आटोकाट प्रयत्न केला होता. स्थानिक पातळीवर प्रचार, शक्तिप्रदर्शन, रणनीती यांचा जोर लावला गेला. मात्र मतमोजणीच्या दिवशी समोर आलेल्या आकडेवारीने भाजपच्या अपेक्षांवर पाणी फेरले. खारेपाटातील मतदारांनी भाजपला स्पष्ट आणि ठाम संदेश देत कमळ कोमेजल्याचे चित्र उभे केले.



आंबेपूर मतदारसंघात तिहेरी लढत रंगली होती. या लढतीत भाजपला विजयाची मोठी आशा होती. परंतु, खारेपाटातील मतदारांनी भाजपच्या उमेदवाराला जवळपास साडेचार हजार मतांनी पराभूत करत धक्कादायक निकाल दिला. हा पराभव केवळ आकड्यांपुरता मर्यादित नसून, मतदारांनी व्यक्त केलेला स्पष्ट रोष म्हणून पाहिला जात आहे. शहापूर मतदारसंघातही भाजपला मोठी अपेक्षा होती. येथे भाजपच्या सवाई पाटील यांचा तब्बल साडेसहा हजार मतांनी दारुण पराभव झाला. एवढ्या मोठ्या फरकाने झालेला पराभव हा राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे. दोन्ही मतदारसंघांतील निकाल पाहता खारेपाटातील मतदारांनी कमळाला सपशेल नाकारल्याचे स्पष्ट झाले आहे.भाजपने केलेले सर्व प्रयत्न, आखलेल्या रणनीती आणि स्थानिक पातळीवरील गणिते मतदारांनी धुडकावून लावल्याचे या निकालातून दिसून येते. खारेपाटातील हा निकाल आगामी राजकीय समीकरणांवर परिणाम करणारा ठरणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. •> पान २ वर

## चौलमध्ये शिंदे गटाचा राडा

### ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांवर उगारल्या तलवारी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

चौल येथे शिंदे गटाच्या विजयी उमेदवाराच्या मिरवणुकीदरम्यान शिंदे गट आणि ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये तणाव निर्माण झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली. चौल-तुलाडदेवी येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या शाखेसमोर मुद्दाम फटाके फोडण्याच्या प्रयत्नावरून वाद निर्माण झाला आणि त्यानंतर शिंदे गटाच्या काही कार्यकर्त्यांनी चाकू, सुरे, तलवारी आणि काठ्या उगारल्याची चर्चा आहे. •> पान २ वर

## हुकूमशाही राजवटीची नांदी

### जिंकल्यानंतर आभार नाही तर आमदारांकडून धमकी

**| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |**

निवडणूक जिंकल्यानंतर लोकप्रतिनिधींनी जनतेचे आभार मानणे, ही लोकशाहीची किमान अपेक्षा असते. मात्र, शिंदे गटाच्या आमदारांनी विजयाच्या नशेत ममै हू डॉनफअशी घोषणा करून मतदारांच्या अपेक्षांनाच तिलांजली दिली आहे. दरम्यान, या विधानामुळे संपूर्ण तालुक्यात संतापाची लाट उसळली असून, लोकशाही व्यवस्थेला थेट आव्हान दिले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. लोकप्रतिनिधीची भूमिका सेवकाची असते; मात्र या विधानातून सत्तेचा मज आणि दडपशाहीची भाषा उघडपणे समोर आल्याने मतदारांकडून तीव्र



नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

सत्तेच्या जोरावर वापरलेली ही भाषा केवळ अहंकाराचे प्रदर्शन नसून, प्रशासनावर दबाव टाकण्याची, विरोधकांना गप्प बसवण्याची आणि सामान्य जनतेच्या आवाजावर गदा आणण्याची मानसिकता दर्शवते, असे मत सुजाण नागरिक व्यक्त करत आहेत. मतदारांनी दिलेला कौल हा जबाबदारीचा असून, माजाचा परवाना नाही, असे मत ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केले आहे. तरी ही विजयाच्या नशेतून केलेली ही घोषणा प्रशासनावर दबाव, विरोधकांवर अरेरावी आणि सामान्य जनतेच्या आवाजावर गदा येण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

डॉनसारखी भाषा ही लोकशाही मूल्यांना न शोभणारी असून, ही हुकूमशाही मानसिकतेची नांदी असल्याचा आरोप राजकीय विश्लेषकांकडून केला जात आहे. लोकशाहीत सत्ताधीश •> पान २ वर

## उरणमध्ये महाविकास आघाडीचे वर्चस्व

### जिल्हा परिषदेच्या ४ पैकी ३, पंचायत समितीच्या ८ पैकी ७ जागांवर विजय



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यात पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये भाजपा महायुतीचे पानिपत झाल्याचे निकालावरून दिसून येत आहे. जिल्हा परिषदेच्या चार जागांपैकी तीन जागा महाविकास आघाडीने जिंकल्या आहेत. तर पंचायत समितीच्या आठ जागांपैकी सात जागादेखील जिंकून महाविकास आघाडीने वर्चस्व मिळविले आहे. •> पान २ वर

## सुधागडमध्ये 'गड आला पण सिंह गेला'

### खासदार पत्नी नीलिमा पाटील यांचा पराभव

**| पाली | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या निकालांनी तालुक्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. परळी जिल्हा परिषद गटातून उमेदवारी करत असलेल्या खासदार धैर्यशील पाटील यांच्या पत्नी नीलिमा धैर्यशील पाटील यांचा पराभव झाल्याने भाजपसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. या निकालानंतर सुधागड तालुक्यात 'गड आला पण सिंह गेला' अशी राजकीय परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा रंगू लागली आहे.

परळी जिल्हा परिषद गटात सन्मान समितीच्या शर्मिला शरद बोडके यांनी सौ. नीलिमा धैर्यशील पाटील यांचा दणदणीत पराभव



केला. या लढतीत नीलिमा धैर्यशील पाटील यांना ७१२९ मते मिळाली, तर शर्मिला शरद बोडके यांना १००६० मते मिळून त्या २९३१ मतांनी विजयी झाल्या. राज्यपातळीवरील मोठे नेतृत्व आणि संसदीय बळ असूनही झालेला हा पराभव भाजपसाठी आत्मपरीक्षण करायला लावणारा ठरतो आहे.

जांभूळपाडा गणात मात्र भाजपच्या जागृती राजेश मानकर यांनी अतिश गोविंद सागळे यांचा पराभव करत भाजपला दिलासा दिला. जागृती मानकर यांना ४१७८, तर अतिश सागळे यांना ३३६५ मते मिळाली. त्या ८१३ मतांनी विजयी झाल्या.परळी गणात शिवसेना (उबाठा) गटाच्या प्रणिता राजेश परदेशी यांनी भाजपच्या सुनंदा विठ्ठल सिंदकर यांचा पराभव केला. •> पान २ वर



## कर्जतमध्ये परिवर्तन आघाडीचा महायुतीला धोबीपछाड

- **आ. थोरवेंना जोरदार धक्का**
- **सूनबाईंचा दारुण पराभव**

**| कर्जत | प्रतिनिधी |**

मोठे वेणगाव गणात आमदार महेंद्र थोरवे यांच्या सुनबाई श्वेता प्रसाद थोरवे यांचा झालेला पराभव हा कर्जत तालुक्यातील निवडणुकीचा सर्वात चर्चेचा मुद्दा ठरला. शिवसेना ठाकरे गटाच्या चित्रा ठाकरे यांनी ६०७ मतांनी त्यांचा पराभव करत 'जायंट किलर' ठरत मोठा राजकीय संदेश दिला. या निकालानंतर कर्जत तालुक्यात कर्जत परिवर्तन आघाडीचे निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित झाले असून, आ. महेंद्र थोरवेंसह महायुतीला मोठा धक्का बसल्याचे स्पष्ट झाले आहे.

कर्जत तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत कर्जत परिवर्तन आघाडीने महायुतीला जोरदार धोबीपछाड दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना ठाकरे गट यांच्या कर्जत परिवर्तन आघाडीने जिल्हा परिषदेच्या सहाही गटांवर निर्विवाद विजय मिळवत संपूर्ण तालुक्यावर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. तसेच पंचायत समितीच्या १२ पैकी तब्बल १० जागांवर विजय मिळवत आघाडीने महायुतीला जबरदस्त धक्का दिला आहे. या निकालामुळे आमदार महेंद्र थोरवे यांना मोठा राजकीय झटका बसल्याची चर्चा तालुक्यासह जिल्ह्यात सुरू झाली आहे.

महायुतीतील शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेना शिंदे गट यांना प्रत्येकी केवळ एका जागेवर विजय मिळवता आला आहे. तीन जागांवर निवडणूक लढवणाऱ्या भाजपला तसेच स्वबळावर एक जागा लढवणाऱ्या मनसेला पंचायत समितीत प्रवेश करता आलेला नाही. मात्र, जिल्हा परिषद गटात स्वबळावर लढणाऱ्या भाजपने आघाडी व महायुतीला चुरशीची लढत दिल्याचे चित्र काही ठिकाणी दिसून आले.

कर्जत तालुक्यात रायगड जिल्हा परिषदेचे एकूण सहा गट असून, त्यापैकी कळंब गटात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नारायण डामसे यांनी शिवसेना शिंदे गटाचे हरिचंद्र निरगुडा यांचा अवघ्या २०६ मतांनी पराभव केला. कशेळे गटात राष्ट्रवादी काँग्रेस •> पान २ वर

**रामराज पंचायत समितीमधून विजयी | कार्यकर्त्यांमधून जोरदार जल्लोष**

## शेकापच्या अंजली पाटलांचा दणदणीत विजय

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

रामराज मतदारसंघात शेकापचे वर्चस्व पुन्हा एकदा ठसठशीतपणे सिद्ध करत अंजली पाटील यांनी दणदणीत विजय मिळवला. सुरुवातीपासूनच आघाडी कायम ठेवत त्यांनी विरोधकांना चारी मुंड्या चित केले. तब्बल ५ हजार ९१० मते मिळवत ५६२ मतांच्या फरकाने त्यांनी विजय संपादन केला आणि रामराजमध्ये शेकापचा झेंडा पुन्हा फडकवला.



अलिबाग पंचायत समितीच्या रामराज मतदारसंघातून शेकाप महाविकास आघाडीच्या उमेदवार म्हणून अंजली पाटील रिंगणात उतरल्या होत्या. शनिवारी मतदान पार पडले, तर सोमवारी मतमोजणी झाली. मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच अंजली पाटील आघाडीवर असल्याचे चित्र स्पष्ट झाले होते. चिंचोटी, दिवीपारंगी, बोरघर, मालाडे, महान, सुडकोली या भागांमध्ये त्यांनी २०० ते ४७३ मतांची आघाडी घेत निर्णायक पकड निर्माण केली. तीन ते चार मतदान केंद्रे वगळता सर्वच केंद्रांवर त्यांनी आघाडी घेतली. त्यामुळे विजयाचा मार्ग सुरुवातीपासूनच सुकर झाला होता. अखेर अंजली पाटील यांना ५ हजार ९१० मते मिळाली, तर त्यांच्या विरोधकांना ५ हजार ३३५८ मते मिळाली. साडेपाचशेहून अधिक मतांनी मिळालेल्या या विजयामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या विजयाचे जल्लोषात स्वागत करण्यात येत असून, अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे.

| सुरुवातीपासून आघाडी | गावागावांत निर्णायक पकड | संघटनशक्तीचा प्रभाव | बहुतांश केंद्रांवर वर्चस्व |
|---|---|---|---|
| मतमोजणीच्या पहिल्याच फेरीपासून अंजली पाटील आघाडीवर होत्या. प्रत्येक फेरीत त्यांची मतांची आघाडी वाढत गेली आणि विरोधकांची चिंता वाढत गेली. | चिंचोटी, दिवीपारंगी, बोरघर, महान, सुडकोली या भागांत २०० ते ४७३ मतांची आघाडी घेत अंजली पाटील यांनी निर्णायक पकड निर्माण केली. | शेकाप कार्यकर्त्यांनी घराघरांत पोहोचून केलेला प्रचार, स्थानिक प्रश्नांवरील भूमिका आणि मतदारांशी असलेला संपर्क याचा सकारात्मक परिणाम मतदानावर दिसून आला. | तीन-चार मतदान केंद्रे वगळता सर्वच केंद्रांवर अंजली पाटील आघाडीवर राहिल्या. यामुळे विजयाचा मार्ग सुरुवातीपासूनच सुकर झाल्याचे सर्व स्तरातून बोलले जात आहे. |

# खारघरमध्ये शहिदी समागम शताब्दीनिमित्त कार्यक्रम

## जो बोले सो निहाल सत् श्री अकालच्या घोषणांनी परिसर दुमदुमला

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर' यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त दि. २८ फेब्रुवारी व ०१ मार्च २०२६ रोजी खारघर, नवी मुंबई येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. त्यानिमित्ताने या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी जिल्ह्यातील शीख, सिकलगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन तथा भगत नामदेव (वारकरी) संप्रदाय समाजातील प्रतिनिधींची उपस्थिती मोठ्या प्रमाणात असणार आहे. या कार्यक्रमाची सुरुवात आरम्भता की 'अरदास' खालसा भिंडरावाले, मुखी दमदमी टकसाल, प्रधान संत समाजचे संत ज्ञानी हरनाम सिंघ जी यांच्या हस्ते ओवे मैदान, सेक्टर २९, खारघर, नवी मुंबई येथे सोमवारी करण्यात आली.

यावेळी कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक राजा दयानिधी, सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, अपर आयुक्त फरोग मुकादम, उपायुक्त विजय म्हसाळ, पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, रश्मी नांदेडकर, वाहतूक उपायुक्त तिरुपती काकडे, हिंद दी चादर कार्यक्रमाच्या राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, क्षेत्रिय आयोजन समिती, नवी मुंबईचे अध्यक्ष अमरपाल सिंघ रंधावा, सुप्रीम कॉन्सील, नवी मुंबई गुरुद्वाराचे अध्यक्ष श्री. जसपाल सिंग सिद्धू, खारघर गुरुद्वाराचे अध्यक्ष परमजित सिंग बल, महाराष्ट्र राज्य सिख समन्वय समितीचे श्री. चरणदीप सिंग (हॅप्पी सिंघ), राज्यस्तरीय समितीचे निमंत्रक तथा महाराष्ट्र राज्य पंजाब अकॅडमीचे कार्याध्यक्ष बल मिलकित सिंग, उपजिल्हाधिकारी रविंद्र राठोड, नवी प्रेस क्लबचे अध्यक्ष तथा कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष मनोज जालनावाला यांच्यासह शीख, सिकलगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन तथा भगत नामदेव (वारकरी) संप्रदाय समाजातील प्रतिनिधी उपस्थित होते.

संत ज्ञानी हरनाम सिंघजीं नी सर्वप्रथम 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर' यांच्या बलिदानाविषयीचे माहात्म्य सांगितले. आजच्या काळात 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर' यांच्या शहादतविषयी जागर करणे का महत्वाचे आहे, याविषयी त्यांनी सविस्तर विवेचन दिले. विशेषत्वाने त्यांनी प्रशासनाचे मनापासून कौतुक केले, आभार मानले. ते म्हणाले की, नागपूर आणि नांदेड या ठिकाणी ''हिंद दी चादर'' या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये प्रशासनाच्या सहकार्याची खूप मोठी जोड होती. आणि आज खारघर, नवी मुंबई येथे देखील आजच्या आरंम्भता की ''अरदास'' कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या खुद्द विभागीय आयुक्तांपासून ते अगदी शेवटच्या अधिकाऱ्यापर्यंत सर्वांच्या उत्साहातून हे स्पष्ट होत आहे की, येथील कार्यक्रम देखील खूप मोठ्या प्रमाणात यशस्वी होणार आहे. सर्वांच्या सहकार्याने आपण हा कार्यक्रम उत्तमरित्या आयोजित करू या, असे आवाहन शेवटी त्यांनी केले.

यावेळी कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी म्हणाले की, खारघर येथे श्री गुरु तेग बहादूर जी यांच्या ३५० व्या शहीद जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या भव्य कार्यक्रमासाठी प्रशासनाने व्यापक नियोजन केले असून तयारी महिनाभरापूर्वीच सुरू करण्यात आली आहे.

रायगड व ठाणे जिल्हा प्रशासनाने २५ समित्यांची स्थापना करून विविध जबाबदाऱ्या निश्चित केल्या आहेत. नागपूर आणि नांदेड येथील यशस्वी कार्यक्रमांनंतर आता खारघर येथील कार्यक्रमाकडे देश-विदेशातील भाविकांचे लक्ष लागले आहे.

कार्यक्रमासाठी प्रशासन, पोलीस व महानगरपालिका यंत्रणा समन्वयाने दिवसरात्र कार्यरत असून भाविकांसाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती विभागीय आयुक्त सूर्यवंशी यांनी दिली. गुरु नानक नामलेवा समिती, शीख समुदाय तसेच विविध समाजघटकांच्या सहकार्याने हा कार्यक्रम भव्य आणि ऐतिहासिक स्वरूपात पार पडणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

''हिंद दी चादर'' कार्यक्रमाच्या राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक यांनी प्रास्ताविक भाषणात गुरु तेग बहादूरजी यांच्याशी लबाना, मोहयाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन तथा भगत नामदेव (वारकरी) संप्रदाय यांच्याशी निगडीत असलेला इतिहास सांगितला. तसेच त्यांनी नागपूर आणि नांदेड येथे झालेल्या कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. त्याचबरोबर खारघर येथे होणाऱ्या कार्यक्रमासाठी सर्व समाजबांधवांनी नि:स्वार्थ सेवाभाव ठेवून सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी केले.



# शिहू गटात मशाल पेटली

### जिल्हा परिषद उमेदवार पल्लवी भोईर, संजय भोईर विजयी

**। शिहू । प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांची रणधुमाळी थांबली आहे मात्र कोण जिंकणार? मतदार राजा कोणाला कौल देणार? विजयाचा गुलाल कोणाचा असेल? काय असेल निकाल याकडे संपूर्ण पेण तालुक्याचे लक्ष लागले होते. पेण तालुक्यातील शिहू जिल्हा परिषद गट प्रतिष्ठेचे समजले जाते. या गटात जिल्हापरिषदेसाठी महायुतीच्या शर्मिला वैकुंठ पाटील विरुद्ध शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पल्लवी प्रसाद भोईर यांच्यात चुरशीची लढत पाहायला मिळाली, तर पंचायत समितीसाठी महायुतीचे प्रफुल्ल पाटील विरुद्ध माजी सभापती संजय भोईर यांच्यात लढत झाली. यात जिल्हा परिषद उमेदवार पल्लवी प्रसाद भोईर यांनी ४०७३ मतांची आघाडी घेत दणदणीत विजय मिळवला, तर पंचायत समितीचे उमेदवार संजय भोईर यांनी १६७१ मतांची आघाडी घेत विजयाचा गुलाल उधळला आहे. संजय भोईर हे तिसऱ्यांदा पंचायत समितीवर निवडून गेले असून, गाव खेड्यात, आदिवासी वाड्यांवरील जनता त्यांच्यापाठी खंबीर असते.



# गरजूंना आर्थिक मदतीसाठी क्रिकेट स्पर्धा

### ग्रेस फुल हॅन्ड ट्रस्टचा स्तुत्य उपक्रम

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

ग्रेस फुल ट्रस्ट ही गरजूंच्या मदतीसाठी सतत पुढाकार घेत असते. ह्या अगोदर ग्रेस फुल हॅन्ड ट्रस्टने अनेक सामाजिक उपक्रम राबविलेले आहेत. याच सामाजिक कार्याच्या शृंखलेतून ग्रेस फुल हॅन्ड ट्रस्टने गरजूना आर्थिक मदतीसाठी महिलांची क्रिकेट स्पर्धा कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल येथे आयोजित केली होती. यावेळी गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उर्वी अमित रॉय आणि तनिषा अमित रॉय यांना ग्रेस फुल हॅन्ड ट्रस्टतर्फे आर्थिक मदत देण्यात आली, असे ट्रस्टच्या सर्वेसर्वा प्रो. पायल मधोक यांनी सांगितले.

याप्रसंगी सहा महिलांच्या चमूने सहभाग घेतला होता. ह्या चमूच्या मयुरी सोळंकी, पूनम पाटील, भावना दास, सुमा ललित, उर्मिला जोशी आणि सुजाता शेलार कप्तान होत्या. याप्रसंगी पनवेल महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगरसेवक प्रीती जॉर्ज, विशेष कार्यकारी अधिकारी अरविंद मोरे, ॲड. मनोहर सचदेव आणि योगा ट्रेनर मेघा इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत पनवेल लीगल वोररियर्स संघ विजेता ठरला, तर गोदरेज टायटन संघ हा उपविजेता राहिला. या स्पर्धेत बेस्ट कॅप्टन मयुरी निखिल सोळंकी, बेस्ट बॅस्टमन सृष्टी सिंग, बेस्ट बॉलर सुजाता शेलार आणि बेस्ट ऑल राऊंडर भावना दास यांनी पुरस्कार पटकाविला. क्रिकेट स्पर्धेची सुरुवात उर्जावान वॉर्म अपने मेघा इंगळे योगा ट्रेनर यांच्याद्वारे करण्यात आली, त्यामुळे महिला क्रिकेट पटूमध्ये खूपच उत्साह संचारला होता. संपूर्ण क्रिकेट स्पर्धेचे समालोचन अरविंद मोरे यांनी करून सर्व खेळाडूंना प्रोत्साहन देऊन स्पर्धेत चांगलीच रंगत आणली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रो. पायल मधोक यांनी केले.

# विलेपार्लेत उंच इमारतीला आग

### एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईच्या पश्चिम उपनगरातील विलेपार्ले (पूर्व) येथील सुविधा पर्ल या १३ मजली निवासी इमारतीला सोमवारी सकाळी भीषण आग लागली. इमारतीच्या १३ व्या मजल्यावरील एका घराला लागलेल्या या आगीत ६३ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला असून, एक ३४ वर्षीय महिला जखमी झाली आहे. धुराचे लोट संपूर्ण मजल्यावर पसरल्याने गुदमरून हा मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

महपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिलेल्या माहितीनुसार, फिरोज शाह मेहता रोडवरील सुविधा पर्ल इमारतीच्या १३ व्या मजल्यावर सकाळी ९:५१ च्या सुमारास आग लागल्याचा कॉल अग्निशमन दलाला मिळाला. इलेक्ट्रिक वायरिंगच्या डक्टमधून ही आग लागली आणि काही वेळातच तिने सदनिकेतील इतर खोल्यांना आपल्या विळख्यात घेतले.बचाव कार्यात धुराचा अडथळाअग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचाव कार्य सुरू केले. मात्र, आग सर्वात वरच्या मजल्यावर असल्याने आणि संपूर्ण कॉरिडॉर व जिने दाट धुराने भरल्यामुळे जवानांना सदनिकेत प्रवेश करणे कठीण झाले होते. ''आम्ही जेव्हा पीडितांना बाहेर काढले, तेव्हा त्या दोघीही बेशुद्ध होत्या,'' अशी माहिती अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी दिली. ज्येष्ठ महिलेचा दुर्दैवी मृत्यूया घटनेत भावना सत्रा (६३) आणि अनेरी (३४) या दोघींना तातडीने नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, भावना सत्रा यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. धूर फुफ्फुसात गेल्याने त्यांना श्वास घेण्यास त्रास झाला आणि त्यांचा मृत्यू झाला. अनेरी यांची प्रकृती सध्या स्थिर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# राज्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



राज्यासह देशातील हवामानात सातत्याने बदल होताना दिसत आहे. ऐन फेब्रुवारी महिन्यात पाऊस तर उकाडा बघायला मिळत आहे. राज्यातून थंडी जवळपास गायब झाली. उत्तरेकडे कडाक्याची थंडी पडली असून वातावरणात चढ-उतार बघायला मिळत आहे. निफाड येथे राज्यातील नीचांकी तापमानाची नोंद झाली. निफाडमध्ये १०.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. दुपारच्यावेळी उकाडा असेल. दुपारच्यावेळी २ ते ३ अंशांची घट होण्याची शक्यता आहे. यासोबतच अनेक भागात आज ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज आहे. भारतीय हवामान विभागाने देशातील अनेक राज्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला. यासोबतच उत्तरेकडील राज्यात कडाक्याची थंडी कायम असेल.

मुंबईत हवेचा गुणवत्ता निर्देशांक पुन्हा वाईट श्रेणीत पोहोचलाय. हवा पुन्हा दुषित झालीये. दृष्यमानतेवर परिणाम स्पष्ट दिसून येतोय. आज मुंबईत हवेचा गुणवत्ता निर्देशांक हा २०४ वर पोहोचलाय. पीएम १० चं प्रमाण १८० वर तर पीएम २.५ चं प्रमाण १५१ वर गेलेय. आगामी ४८ तासांत किमान तापमानात २-३ अंशांची घट होणार असल्याने राज्यात पुन्हा एकदा थंडीचा जोर वाढण्याची चिन्हे आहेत. मुंबईत सकाळी धुरकट वातावरण तर दुपारी आकाश निरभ्र असेल. कमाल तापमान ३५ अंशांच्या आसपास राहण्याची शक्यता असल्याने उन्हाचा चटकाही जाणवणार आहे. राज्याच्या हवामानात सध्या मोठे चढ-उतार पाहायला मिळत आहेत. भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, आज राज्यात संमिश्र हवामान राहण्याची शक्यता आहे. काही भागांत थंडीची लाट येण्याचे संकेत आहेत. तर काही ठिकाणी उन्हाचा तडाखा वाढू शकतो. पुढील ४८ तासांत हे हवामान पुन्हा बदलण्याचे संकेत आहेत. दरम्यान, पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, उत्तर प्रदेश, उत्तर राजस्थान, छत्तीसगड आणि बिहारमध्ये तापमान ५ ते १० अंश सेल्सिअस दरम्यान होते. यासोबतच मुसळधार पावसाचाही इशारा देण्यात आला. देशात काही भागात मुसळधार पाऊस, कडाक्याची थंडी तर काही भागात थेट उकाडा जाणवत आहे. सतत हवामानात बदल होताना दिसत असून याचा परिणाम थेट आरोग्यावर होताना दिसत आहे.

पान १ वरून

## धनशक्तीचा विजय!

१३ जानेवारीपासून निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच जिल्ह्यात प्रचाराला सुरुवात झाली. महाविकास आघाडी, राष्ट्रवादी, शिवसेना उबाठा गट, शिवसेना शिंदे गट आणि भाजप यांच्यात थेट लढत पाहायला मिळाली. काही ठिकाणी दुहेरी, तिहेरी, चौरंगी तर काही ठिकाणी पाचपेक्षा अधिक उमेदवार रिंगणात उतरल्याने निवडणूक अत्यंत चुरशीची ठरली. जिल्हा परिषद व पंचायत समिती मिळून एकूण ५०२ उमेदवार मैदानात होते. त्यामध्ये जिल्हा परिषदेच्या ५९ जागांसाठी १७३ तर पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी ३२९ उमेदवारांचा समावेश होता. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत मतदान पार पडले. १७ लाख ३८१ मतदारांपैकी ११ लाख ८८ हजार ८०४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. एकूण ६९.९१ टक्के मतदान नोंदवले गेले. सोमवारी (दि. ९) सकाळी दहा वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. निकालाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले होते. दुपारी दीड वाजेपर्यंत चित्र स्पष्ट झाले आणि जनशक्तीला मागे टाकत धनशक्तीचा विजय झाल्याचे अधोरेखित झाले.

## उरणमध्ये महाविकास आघाडीचे वर्चस्व

उरण तालुक्यात जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला मतदारांनी अनुकूल कौल दिल्यामुळे तालुक्यात भाजपा महायुतीची पीछेहाट झाल्याचे दिसून येत आहे. शनिवारी सात फेब्रुवारीला जिल्हा परिषदेच्या चार जागांसाठी १४ उमेदवार, तर पंचायत समितीच्या आठ जागांसाठी २३ उमेदवार रिंगणात उतरले होते. सोमवारी (दि.९) फेब्रुवारी रोजी उरण बोकडविरा येथील सिडकोच्या प्रशिक्षण इमारतीत मतमोजणी प्रक्रिया पार पडली. त्यामध्ये महाविकास आघाडीने जिल्हा परिषदेवर व पंचायत समितीवर बहुमत सिद्ध केले आहे.

यामध्ये जिल्हा परिषद नवघर २६ गटातून, महाविकास आघाडीच्या शिवसेना उबाठा गटाच्या प्रेरणा कुणाल पाटील यांना १०६१७ मते मिळाली त्यांच्या प्रतिस्पर्धी भाजपा महायुतीच्या प्रभावती राजाराम भोईर यांना ६१९८ मते प्राप्त झाल्यामुळे त्यांचा ४,४१९ मतांनी पराभव झाला. तर नवघर पंचायत गण ५१मध्ये महाविकास आघाडीचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे परेश धनाजी ठाकूर यांना ४३४१ मते मिळाली, तर त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपा महायुतीचे हरेश गंगाधर भोईर यांना ३९६८ मते मिळाल्यामुळे त्यांचा ३३७ मतांनी पराभव झाला. तर भेंडखळ पंचायत ५२ गणातून महाविकास आघाडीचे शिवसेना उबठा गटाचे दीपक सुरेश भोईर यांना ४२७० मते पडली. तर भारतीय जनता पार्टीचे मिलिंद काशिनाथ पाटील यांना ३१३६ मते प्राप्त झाली. त्यामुळे त्यांचा १,१३४ मतांनी पराभव झाला. तर जासई गट २७ मधून महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार डॉ. मनीष अनंत पाटील यांना १०, ८०३ मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपाचे महायुतीचे जे.डी. जोशी यांना ८८११ मते मिळाल्यामुळे त्यांचा १९९२ मतांनी पराभव झाला. तर जासई पंचायत ५३ गणातून महाविकास आघाडीच्या शेकापच्या निर्मला नरेश घरत यांना ४१६५ मते मिळाल्यामुळे त्या विजयी झाल्या आहेत. तर त्यांचे भाजपा महायुतीचे प्रतिस्पर्धी उमेदवार मनीषा बळीराम घरत यांचा त्यांनी पराभव केला. तसेच चिर्ले पंचायत ५४ गणातून महाविकास आघाडीच्या शेकापच्या उमेदवार प्रियांका दीपक मढवी या ६२४१ मतांनी विजयी झाल्या. त्यांनी भाजपच्या ज्योत्सना अजित पाटील यांचा पराभव केला. तसेच जिल्हा परिषद गट क्रमांक २८ चाणजे मधून भाजपा महायुतीचे उमेदवार रीना जितेंद्र घरत यांना १००६९ मते प्राप्त झाली. तर महाविकास आघाडीचे शिवसेना उबाठा गटाचे उमेदवार सिद्धी सागर कडू यांना ८४३७ मते मिळाल्यामुळे त्यांचा १६३२ मतांनी निसटता पराभव झाला. तर पंचायत गण ५५ केगाव मधून, महाविकास आघाडीचे शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार महेश महादेव म्हात्रे यांना ४०३५ मते प्राप्त झाल्यामुळे ते विजयी झाले. त्यांनी भाजपच्या राजेंद्र आत्माराम ठाकूर यांचा पराभव केला. तर चाणजे पंचायत गण क्रमांक ५६ मधून भारतीय जनता पार्टीचे कैलास मोरेश्वर भोईर हे ४७५१ मतांनी निवडून आले. त्यांनी शेकापच्या ॲड सागर सदानंद कडू यांचा पराभव केला. चिरनेर जिल्हा परिषद गटातून महाविकास आघाडीचे उमेदवार अविनाश ठाकूर हे १४९३२ मतांनी निवडून आले. तर त्यांचे भाजपचे प्रतिस्पर्धी देवेंद्र विनायक पाटील यांना ११,१६९ मते मिळाल्यामुळे त्यांचा ३७६३ मतांनी पराभव झाला. चिरनेर पंचायत गणातून महाविकास आघाडीच्या उबाठा गटाच्या कविता रुपेश पाटील यांना ८२४७ मते प्राप्त झाल्यामुळे त्याही विजयी झाल्या. त्यांच्या प्रतिस्पर्धी भाजपच्या उमेदवार साक्षी सुजित पाटील यांना ५२२२ मते प्राप्त झाल्यामुळे त्यांचा पराभव झाला. आवरे पंचायत गणातून महाविकास आघाडीच्या शेकापच्या प्रारंभी अविनाश गावंड यांना ७४१४ मते प्राप्त झाल्यामुळे त्या विजयी झाल्या आहेत. शेकापमधून भाजपमध्ये जाऊन उमेदवारी लढविणाऱ्या उरण पंचायत समितीच्या माजी सभापती समिधा निलेश म्हात्रे यांचा पराभव केला. उरण तालुक्यात महाविकास आघाडीने जोरदार एन्ट्री घेतल्याने भाजपा महायुतीला बहुमतांनी हुलकावणी दिली आहे.

## सुधागडमध्ये 'गड आला पण सिंह गेला'

प्रणिता परदेशी यांना ५६८३, तर सुनंदा सिंदकर यांना ३०९५ मते मिळाली. या लढतीत प्रणिता परदेशी २५८८ मतांनी विजयी झाल्या.

राबगाव गणात भाजपच्या सुनीता किसन लेंडी यांनी मनिषा भरत डोके यांचा पराभव केला. सुनीता लेंडी यांना ४१८८, तर मनिषा डोके यांना ३२४२ मते मिळाली. त्या ९४६ मतांनी विजयी झाल्या.

राबगाव गटात भाजपचे चंद्रकांत कृष्णा वारगुडा यांनी काशिनाथ ताया हंबीर यांचा पराभव करत १८७४ मतांची आघाडी घेतली. वारगुडा यांना ९८०७, तर हंबीर यांना ७९३३ मते मिळाली. अडुळसे गणात राष्ट्रवादी काँग्रेसचे संदेश परशुराम शेवाळे यांनी मिलिंद भिकू शेळके यांचा पराभव केला. शेवाळे यांना ५६९०, तर शेळके यांना ३६७२ मते मिळाली. ते २०१८ मतांनी विजयी झाले.

एकूणच, या निकालांवर नजर टाकली असता, सुधागड तालुक्यात कोणत्याही एका पक्षाचे वर्चस्व दिसून येत नसून, मतदारांनी प्रत्येक गट व गणात वेगवेगळा निर्णय दिला आहे. मात्र, खासदार धैर्यशील पाटील यांच्या पत्नींचा पराभव हा या निवडणुकांचा राजकीय केंद्रबिंदू ठरला असून, आगामी काळात तालुक्यातील राजकारणाची दिशा ठरवणारा निकाल म्हणून त्याकडे पाहिले जात आहे.

## चौलमध्ये शिंदे गटाचा राडा

मिळालेल्या माहितीनुसार, शिंदेगटाचे कार्यकर्ते नितीन दिलीप राऊत आणि हर्षल काशिनाथ नाईक यांनी मिरवणुकीदरम्यान या ठिकाणी फटाके फोडण्याचा प्रयत्न केला. याठिकाणी फटाके फोडू नयेत, अशी विनंती यापूर्वीच करण्यात आली होती. तरीदेखील त्यांनी मुद्दाम फटाके लावण्याचा प्रयत्न केल्याने त्यांना रोखण्यात आले. याच कारणावरून दोन्ही गटांत बाचाबाची सुरू झाली. वाद वाढत गेल्यानंतर शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी चाकू, सुरे, तलवारी आणि काठ्या हातात घेतल्याची चर्चा आहे. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची माळ बाजूला फेकून दिल्याचे सांगितले जाते. वारंवार विनंती करूनही फटाके फोडण्याचा प्रयत्न केल्यामुळेच वाद चिघळल्याचे बोलले जात आहे. घटनेदरम्यान विद्धेश माळी हा ४० ते ५० तरुणांना घेऊन मारामारीच्या उद्देशाने आल्याचीही चर्चा आहे. परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मध्यस्थी केली आणि वाद शांत करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, रेवदंडा पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांविरोधात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या घटनेमुळे चौल परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले.

## हुकूमशाही राजवटीची नांदी

नव्हे, जबाबदार लोकप्रतिनिधी अपेक्षित असतो. अन्यथा सत्तेचा माज दहशतीत बदलेल आणि त्याची किंमत जनतेलाच मोजावी लागेल, असा इशारा विश्लेषकांकडून दिला जात आहे.

आज शब्दांतून धमकी दिली जात आहे; उद्या ती कृतीतून उतरली तर काय? असा थेट सवाल आता जनतेकडून विचारला जात आहे. मडॉनफ्फ्सारख्या उपमा या कायद्याच्या राज्याला न शोभणाऱ्या असून, अशा वक्तव्यांमुळे लोकशाहीच्या मुळावर घाव घातला जात असल्याची तीव्र टीका होत आहे. त्यामुळेच या घटनेकडे केवळ एक विधान म्हणून नव्हे, तर हुकूमशाही मानसिकतेची स्पष्ट नांदी म्हणून पाहिले जात आहे. परिणामी, संविधान चालणाऱ्या देशात मडॉनगिरीमला स्थान नाही, हे सत्ताधाऱ्यांनी विसरू नये, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## महायुतीला धोबीपछाड

(अजित पवार गट) च्या वर्षा सुरेश दोरे यांनी शिवसेना शिंदे गटाच्या प्रमिला भरत शीद यांचा ३७१९ मतांनी दणदणीत पराभव करत मोठा विजय मिळवला. माणगाव तर्फे वरेडी गटात राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुवर्णा प्रदीप ठाकरे यांनी शिवसेना शिंदे गटाच्या रेशमा योगेश मिसाळ यांचा केवळ १९ मतांनी पराभव केला. या गटात स्वबळावर लढलेल्या भाजपच्या राधिका किशोर ठाकरे यांनी ५०९८ मते मिळवत जोरदार लढत दिली.

नेरळ गटात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सुनीता रोहिदास मोरे यांनी शिवसेना शिंदे गटाच्या सुनीता सुरेश टोकरे यांचा ८८३ मतांनी पराभव केला. कडाव गटात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे मारुती उर्फ बाबू घारे यांनी शिवसेना शिंदे गटाचे योगेश कांबेरे यांचा १९५५ मतांनी पराभव करत विजय मिळवला. मोठे वेणगाव गटात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या उषा शंकर ठोंबरे यांनी शिवसेना शिंदे गटाच्या संगीता वसंत वाघमारे यांचा तब्बल ५५४७ मतांनी पराभव करत मोठा विजय संपादन केला.

पंचायत समितीच्या १२ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत कर्जत परिवर्तन आघाडी आणि महायुती यांच्यात थेट लढत झाली. पोशीर गणात महायुतीकडून शेकापच्या रेशमा अनिल जोशी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या हर्षला वेहले यांचा १०२४ मतांनी पराभव केला. कळंब गणात शिवसेना ठाकरे गटाच्या कमलाबाई शिंगवा यांनी महायुतीतील शेकापच्या नीलम वसंत ढोले यांचा १७४७ मतांनी पराभव केला. पाथरज गणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कविता भरत पादीर यांनी शिवसेना-शेकाप महायुतीच्या अश्विनी कांता पादीर यांचा १९७१ मतांनी पराभव केला.

कशेळे गणात राष्ट्रवादी काँग्रेसचे अक्षय राम तिटकारे यांनी शिवसेना शिंदे गटाचे सचिन बालकृष्ण भोईर यांचा १४१९ मतांनी पराभव केला. माणगाव तर्फे वरेडी गणात शिवसेना शिंदे गटाचे महेश सुरेश विरले यांनी शिवसेना ठाकरे गटाचे संदेश रमेश हजारे यांचा १७८ मतांनी पराभव करत विजय मिळवला. उकरूल गणात शिवसेना ठाकरे गटाच्या नमिता लहू श्रीखंडे यांनी मनसेच्या प्रियंका जितेंद्र पाटील यांचा २७४९ मतांनी दणदणीत पराभव केला, तर भाजपच्या सुप्रिया राजेश भगत यांना तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.नेरळ गणात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे भगवान बाळकृष्ण चंचे यांनी भाजपच्या नम्रता नितीन कांदळगावकर यांचा तब्बल ३३६८ मतांनी पराभव केला. दामत गणात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे महेश लक्ष्मण खारीक यांनी भाजपचे माजी सदस्य नरेश सुरेश मसने यांचा ११९० मतांनी पराभव केला. वाकस गणात राष्ट्रवादी काँग्रेसचे नितीन जयराम धुळे यांनी शिवसेना शिंदे गटाचा १११४ मतांनी पराभव केला. कडाव गणात शिवसेना ठाकरे गटाच्या सुषमा चेतन पवाळी यांनी शिवसेना शिंदे गटाच्या संध्या सुदाम पवाळी यांचा ६९९ मतांनी पराभव केला.

## राज्यात एमपीएससीकडून मेगा भरती

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात लवकरच सुमारे ७० हजार पदांची मोठी नोकरभरती प्रक्रिया राबवण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ही भरती नव्या, पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने करण्यात येणार असून तरुणांसाठी ही मोठी संधी मानली जात आहे. या भरतीमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या सुमारे २० हजार पदांचा समावेश असेल, तर उर्वरित पदे आयोगाबाहेरील विविध विभागांमध्ये भरली जाणार आहेत.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सेवा प्रवेश नियमावली सुधारणा संदर्भात उच्चस्तरीय बैठक पार पडली. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि संबंधित विभागांचे सचिव उपस्थित होते. भरती प्रक्रियेत आवश्यक कौशल्ये, पात्रता निकष आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेतले जातील, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. सेवा प्रवेश नियमावलीतील बदलांचा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत मांडला जाणार आहे. भरती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाइन व डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि डिजिलॉकर प्रणालीचा वापर करून प्रमाणपत्र पडताळणी सुलभ करण्यात येईल. पासपोर्टसारख्या संवेदनशील दस्तऐवजांची ऑनलाइन पडताळणी शक्य असल्यास, इतर प्रक्रियांमध्येही हे मॉडेल वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



## निवडक

### मोर्बात अस्लम राऊत यांचा जल्लोष



**माणगाव** : तालुक्यातील मोर्बा जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अस्लम राऊत व मोर्बा पंचायत समिती गणातून अलका सुभाष केकाणे हे विजयी झाल्यानंतर दोघांची मोर्बा शहरात वाजत-गाजत विजयी मिरवणूक काढून जल्लोष करण्यात आला. मोर्बा जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणाची तालुक्यातील हि निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व शिवसेना पक्षाने प्रतिष्ठेची केली होती. मोर्बा जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार अस्लम राऊत यांना ९,४८३ तर त्यांचे प्रतिस्पर्धी शिवसेनेचे रमेश मोरे यांना ७,६३५ मते मिळाली. या गटात अस्लम राऊत हे १,८४८ मतांनी विजयी झाले. मोर्बा पंचायत समिती गणातून राष्ट्रवादीच्या अलका केकाणे यांना ७,००० मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी शिवसेना पक्षाचे पल्लवी मोरे यांना २,८४५ इतके मते मिळाली. या गणातून अलका केकाणे ४,१५५ मतांनी विजयी झाल्या. या दोघांच्या विजयानंतर मोर्बा शहरातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी वाजत -गाजत विजयाचा जल्लोष केला.



### शिहु गटात ठाकरेंच्या शिवसेनेची बाजी

**गडब** : पेण तालुक्यातील शिवसेना ठाकरे गटाचे शिहू जिल्हा परिषदत गटात पल्लवी भोईर या विजयी झाल्या आहेत. तर, पेण पंचायत समितीच्या डोलवी गणातुन प्रिती पाटील आणि शिहु पंचायत समीती गणातुन संजय भोईर हे विजयी झाले आहेत. ही निवडणुक शिवसेना ठाकरे पक्षाचे रायगड जिल्हा संर्पक प्रमुख प्रसाद भोईर यांच्या नेतुत्वाखाली लढविण्यात आली. यावेळी बोलताना भोईर म्हणाले की, ही निवडणुक आम्ही सकारत्मक व जबाबदारीने घेतली. मात्र, भाजपच्या नेत्यांनी ही निवडणुक प्रतिष्ठेची केली होती; परंतु, जनतेचा आमच्या कामावर विश्‍वास होता. म्हणुन जनतेने आमच्यावर विश्‍वास दाखवुन विजयी केले असल्याचे ते म्हणाले.



### घरफोडी करणारे सराईत गुन्हेगार जेरबंद

**पनवेल** : घरफोडी करणार्‍या सराईत गुन्हेगारांना खांदेश्‍वर पोलिसांनी अवघ्या ३६ तासात जेरबंद करून त्यांच्याकडून गुन्ह्यातील जवळपास पावणे दहा लाख रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत केले आहेत. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात होत असलेल्या दिवसा घरफोडीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी खांदेश्‍वर पोलीसांनी या ठिकाणांवरील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले. तसेच, चोरट्यांच्या येण्या-जाण्याच्या मार्गाचा अभ्यास करून मार्गीके वरील फुटेज तपासले. त्यांतनर उपलब्ध तांत्रिक साधनांच्या मदतीने खांदेश्‍वर पोलीसांना या गुन्ह्यातील आरोपी रफिक माझीद शेख (३५), मोहम्मद बिलायत अब्दुल रहिम खान (३०), शकिल रुबील शेख (३०) हे स्वतःचे अस्तित्व लपवून राहत असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. त्यानंरत पोलीस पथकाने या चोरट्यांना शिताफिने ताब्यात घेऊन अटक केली आहे. या आरोपीतांकडे केलेल्या तपासात त्यांच्याकडून चोरलेले ९५ ग्रॅम सोन्याचे व ५२ ग्रॅम चांदीचे दागीने असे एकूण ९ लाख ५६ हजार १५० रुपये किमतीची व गुन्हा करण्यासाठी वापरलेले हत्यारे हस्तगत करण्यात आली आहेत.

### आराठी गणातून पूजा शिंदे विजयी

**श्रीवर्धन** : श्रीवर्धन मतदार संघात भाजप नेते प्रशांत शिंदे यांच्या पत्नी पूजा शिंदे यांनी आराठी गणातून आपला विजयी मिळवला आहे. याच मतदार संघात शिंदे गटाने देखील कडवट झुंज देत बोर्ली गणातून सुकुमार तोंडलेकर यांनी अवघ्या ३५ मतांनी आपला विजय मिळवला. तालुक्यात मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने भाजपला सोबत घेऊन आपले वर्चस्व स्थापित केले. जिल्हा परिषद व पंचायत समिती श्रीवर्धनच्या सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वासंती गुणाजी १२,०९२ मते व वैभवी कोमनाक ८,३८४ मते मिळून जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आलेल्या आहेत. पंचायत समिती निवडणुकीत आराठी गणातून भाजपच्या पूजा शिंदे ४१०९, बागमांडला गणातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अस्मिता चोरगे यांना ४०४१ मते, दिघी गणातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सचिन किर ४२१० मते व बोर्लीपंचतन गणातून शिवसेना शिंदे पक्षाचे सुकुमार तोंडलेकर ३९८५ मते विजयी झालेले आहेत.

# ऑल दी बेस्ट! आजपासून बारावीची परीक्षा

## ३३ हजार विद्यार्थी देणार लेखी परीक्षा



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मंगळवार (दि.१०) पासून बारावीच्या लेखी परीक्षांना सुरुवात होत आहे. जिल्ह्यातील तब्बल ३३ हजार १२१ विद्यार्थी या परीक्षेला बसणार असून, ५२ परीक्षा केंद्रांवर या परीक्षा पार पडणार आहेत. परीक्षेच्या कालावधीत कोणताही गैरप्रकार घडू नये यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक उपाययोजना केल्या आहेत. कॉपीमुक्त अभियान राबविण्यात आले असून, कॉपी करणार्‍यांवर विशेष पथकांमार्फत लक्ष ठेवण्यात येणार आहे. १८ मार्चपर्यंत या परीक्षा सुरू राहणार असल्याची माहिती जिल्हा परिषद शिक्षण विभागाने दिली.

दहावी आणि बारावीच्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्यातील अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यांपैकी एक मानल्या जातात. या परीक्षेनंतर विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीची दिशा ठरते. विविध क्षेत्रांची निवड करण्याची संधी या परीक्षेनंतर उपलब्ध होते. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांचेही या परीक्षेकडे विशेष लक्ष लागून होते. विद्यार्थ्यांनी मनापासून अभ्यास करून तयारी पूर्ण केली असून, पालकांनीदेखील त्यांना अभ्यासासाठी प्रोत्साहन दिले.

मंगळवारपासून सुरू होणार्‍या या परीक्षा सुरळीत पार पडाव्यात यासाठी सर्व तयारी पूर्ण झाली आहे. ५२ केंद्रांवर परीक्षा होणार असून, विद्यार्थ्यांची झडती घेण्यात येणार आहे. जिल्हा व तालुका स्तरावर एकूण २४ भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. प्रत्येक तालुक्यात एक तसेच जिल्हा स्तरावर स्वतंत्र भरारी पथक कार्यरत राहणार आहे. सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, त्यांची सतत पाहणी केली जाणार आहे. संशयास्पद हालचाली आढळल्यास भरारी पथक तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन कारवाई करणार आहे.

कॉपी करणार्‍यांसह कॉपी करण्यास प्रोत्साहन देणार्‍यांविरोधात कडक कारवाई केली जाणार आहे. संबंधित परीक्षा केंद्राची मान्यता रद्द करण्याचीही तरतूद करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रांच्या परिसरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार असून, प्रतिबंधात्मक आदेश लागू केले जाणार आहेत. परीक्षा केंद्रांच्या आसपास असलेली झेरॉक्स दुकाने व इतर दुकाने बंद ठेवण्यात येणार आहेत. तसेच ड्रोन कॅमेर्‍यांच्या माध्यमातूनही परिसरावर लक्ष ठेवले जाणार आहे. त्यामुळे परीक्षा केंद्रातील व परिसरातील प्रत्येक हालचालीवर प्रशासनाची नजर राहणार आहे.

**परीक्षार्थींवर दृष्टीक्षेप**

| तालुके | विद्यार्थी | केंद्र |
|---|---|---|
| पनवेल | १२२५२ | १२ |
| उरण | २१४७ | ३ |
| खालापूर | २४४६ | ४ |
| कर्जत | २७४८ | ५ |
| सुधागड | ६९९ | १ |
| पेण | २०९६ | ४ |
| अलिबाग | २६७१ | ६ |
| मुरूड | ५३५ | १ |
| रोहा | १७५२ | ४ |
| माणगाव | १७२८ | ४ |
| तळा | २३६ | १ |
| म्हसळा | ६१२ | १ |
| श्रीवर्धन | ७४९ | १ |
| महाड | २१८५ | ४ |
| पोलादपूर | २६५ | १ |
| एकूण | ३३१२१ | ५२ |

## खारघरमध्ये पाणीटंचाईची समस्या तीव्र

### पर्यायी व्यवस्था उभारण्याची वेळ



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

गेल्या काही महिन्यांपासून खारघर वसाहतीत पाणीटंचाईची समस्या अधिक तीव्र होत आहे. यावर मात करण्यासाठी अनेक गृहनिर्माण सोसायट्यांनी बोअरवेल जोडणीचा पर्याय स्वीकारला आहे. सिडकोकडून कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा, तसेच पुढील काही दिवसांत उन्हाळा सुरू होणार आहे. उन्हाळ्यात सिडकोकडून रहिवाशांना पुरेसे पाणी मिळत नसल्याने सोसायट्यांवर स्वतःची पर्यायी व्यवस्था उभारण्याची वेळ आली आहे.

खारघर वसाहतीतील लोकसंख्येत वाढ होत आहे. त्यात वसाहतीमधील पाणी अप्पर खारघर आणि तळोजा जात असल्यामुळे रहिवाशांना वसाहतीला उपलब्ध करून दिल्या पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे अनेक सेक्टरमधील सोसायट्यांमध्ये पिण्याच्या व घरगुती वापराच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर टँकरवर अवलंबून रहावे लागत होते. मात्र, टँकरचे वाढते दर आणि अनिश्चित वेळेमुळे रहिवाशांची गैरसोय होत आहे. काही सोसायटी पदाधिकार्‍यांच्या माहितीनुसार, बोअरवेलमुळे सोसायटीमधील स्वच्छता, बागकाम, वाहन, तसेच कपडे धुणे इत्यादी वापरासाठी लागणारे पाणी, तसेच टँकरवरील खर्चात काही प्रमाणात बचत होत असून, रहिवाशांवरील आर्थिक ताण कमी झाला आहे. काही सोसायट्यांनी पावसाळ्यात रेनवॉटर हार्वेस्टिंगची देखील व्यवस्था केली असून, भूजल पातळी टिकवून ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे. बोअरवेल्समुळे तात्पुरता दिलासा मिळत असला तरी, योग्य नियोजनाशिवाय मोठ्या प्रमाणावर भूजल उपसा केल्यास भविष्यात गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात. त्यामुळे बोअरवेल वापरासोबतच पाणी बचतला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे मत पर्यावरण अभ्यासक व्यक्त करीत आहेत. तथापि भूजलाचा अतिवापर टाळण्याचा, इशारा दिला आहे.

## ‘आत्मनिर्भर भारत’ संकल्पनेला बळ

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल येथे पहिल्यांदाच मायक्लिप ही अत्याधुनिक हृदय उपचार प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आली. या उपचारामुळे अत्यंत धोकादायक स्थितीत असलेल्या एका हृदय रुग्णाचे प्राण वाचले आणि ओपन-हार्ट शस्त्रक्रिया टाळणे शक्य झाले. एका ५५ वर्षीय रुग्णाला काही दिवसांपासूनच छातीत वेदना होणे आणि श्वास घेण्यास त्रास जाणवू लागला होता. तपासणीत त्यांच्या हृदयाच्या झडपेत मोठ्या प्रमाणात गुंतागुंत असल्याचे आढळले. तसेच, हृदयाची रक्त पंप करण्याची क्षमता खूपच कमी झाली होती. याआधी २०१९ मध्ये त्यांच्यावर बायपास शस्त्रक्रिया झाली झाल्याने पुन्हा ओपन-हार्ट सर्जरी करणे अतिशय धोकादायक होते. या गंभीर परिस्थितीत मेडिकव्हर हॉस्पिटलच्या हृदयतज्ज्ञांच्या टीमने शस्त्रक्रियेऐवजी कॅथेटरद्वारे उपचार करण्याचा निर्णय घेतला. प्रथम हृदयाला रक्तपुरवठा सुरळीत करण्यासाठी अँजिओप्लास्टी करण्यात आली. त्यानंतर मायक्लिप प्रक्रियेच्या मदतीने हृदयाची झडप बंद करण्यात आली. यासाठी दोन मायक्लिप्स बसवण्यात आल्या. ही प्रक्रिया सुमारे दोन तासांत पूर्ण झाली. उपचारानंतर रुग्णाच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली. एका महिन्याच्या तपासणीत हृदयाची कार्यक्षमता २५ टक्क्यांवरून ४५ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे आढळून आले. रुग्णाला दुसर्‍याच दिवशी घरी सोडण्यात आले.

## हुतात्मा हिराजी पाटील स्मारकाची पाहणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामध्ये मानिवली, नेरळ आणि पिंपळोली ग्रामपंचायत यशस्वी ठरल्या आहेत. त्यातील मानिवली ग्रुपग्रामपंचायत कार्यालयाला रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी भेट दिली. दरम्यान, त्यांनी हुतात्मा हिराजी पाटील स्मारक येथे जाऊन त्यांना अभिवादन केले.

कर्जत तालुक्यातील मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातील ग्रुप ग्रामपंचायत मानिवली, ग्रुप ग्रामपंचायत पिंपळोली व ग्रामपंचायत नेरळ या मानांकित ठरल्या आहेत. त्यातील हुतात्मा हिराजी पाटील यांचे जन्मगाव असलेल्या मानिवली गावी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी भेट दिली. मानिवली येथे भेटीदरम्यान त्यांनी हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून स्मारक आणि परिसराची पाहणी केली. त्यावेळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत हद्दीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांची देखील पाहणी केली. तसेच, ग्रामपंचायतीचा विविध योजनाचा आढावा घेऊन त्यानुसार याबाबत मार्गदर्शन केले. तसेच, आणि जिल्हा परिषद शाळेची पाहणी करून तेथील टेरेस गार्डन आणि सौर ऊर्जा प्रकल्प यांचे कौतुक केले.

## अल्पवयीन मुलीला पळवून नेले

**पनवेल** : एका अल्पवयीन मुलीला कोणीतरी फुस लावून पळवून नेल्याची घटना पनवेल शहरामध्ये घडली आहे. अलिशा तौसिफ तबीब असे या मुलीचे नाव असून तिचे वय १५ वर्षे, उंची ५ फुट अंदाजे, रंग सावळा, चेहरा उभट, बांधा मध्यम, केस काळे लांब, नाक सरळ, अंगात निळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस, काळी पॅन्ट तसेच बुरखा परिधान केलेला आहे. या मुलीबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उप निरीक्षक हजरत पठाण यांच्याशी संपर्क साधावा.

## पनवेलमध्ये कडक पोलीस बंदोबस्त




**। पनवेल । प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी सोमवारी (दि.९) पनवेल येथील वि.खे. हायस्कूलमध्ये पार पडली. मतमोजणीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पनवेल पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे व खांदेश्‍वर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ अधिकारी स्मिता ढाकणे यांनी संपूर्ण परिस्थितीवर काटेकोर लक्ष ठेवले.

यावेळी विजयी उमेदवारांना शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते व नागरिकांनी गर्दी केल्याने परिसरात तणाव निर्माण होऊ नये म्हणून पोलीस प्रशासन सतर्क होते. वरिष्ठ अधिकारी स्मिता ढाकणे यांनी महिलांना आपले सोन्याचे दागिने, मंगळसूत्र सुरक्षित ठेवण्याच्या तसेच नागरिकांनी पाकिटे सांभाळण्याच्या सूचना वारंवार दिल्या. गर्दीत लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. मतमोजणी केंद्र परिसरात सीसीटीव्हीच्या माध्यमातून सतत नजर ठेवण्यात आली होती. तसेच, प्रवेशद्वारांवर कडक तपासणी करण्यात येत होती.

## मजदूर संघाचे अखिल भारतीय अधिवेशन





**। उरण । प्रतिनिधी ।**

भारतीय मजदूर संघाचे तीन दिवसीय २१वे त्रैवार्षिक अखिल भारतीय अधिवेशन धर्मनगरी जगन्नाथ पुरी येथे यशस्वीरीत्या संपन्न झाले. दि.६ ते ८ फेब्रुवारी या कालावधीत पार पडलेल्या या राष्ट्रीय अधिवेशनात देशभरातील विविध क्षेत्रांतील हजारो प्रतिनिधींनी सहभाग घेतला. अधिवेशनात कामगारांच्या हिताशी निगडित गंभीर राष्ट्रीय प्रश्नांवर सखोल चर्चा व मंथन करण्यात आले.

अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणात अखिल भारतीय अध्यक्ष एस. मलेशम यांनी देशातील कामगारविरोधी धोरणांवर तीव्र चिंता व्यक्त केली. त्यांनी जाहीर केले की, दि. २५ फेब्रुवारी रोजी देशभरातील सर्व राज्यांतील जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालये, शासकीय कार्यालये, कामगार कार्यालये व ई-कार्यालयांसमोर धरणा आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनाच्या माध्यमातून कामगार हितांचे संरक्षण, कामगार संहितांमधील आवश्यक सुधारणा, तसेच ‘सरकार जागे व्हा’ या मागणीसाठी जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच, नवीन अखिल भारतीय कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. अधिवेशनाच्या अंतिम दिवशी पुढील २०२६-२९ या तीन वर्षांसाठी नवीन अखिल भारतीय कार्यकारिणीची सर्वसम्मतीने घोषणा करण्यात आली.

यावेळी एस. मलेशम अखिल भारतीय अध्यक्ष, सुरेंद्र कुमार पांडे महामंत्री, बी. सुरेंद्रन संघटन मंत्री, तसेच महाराष्ट्रातील अनिल ढुमणे यांची अखिल भारतीय सचिव, मोहन येणुरे क्षेत्रीय सहसंघटक, जयंत देशपांडे, असंघटित क्षेत्र प्रमुख, शर्मिला पाटील व तृप्ती आळती यांची महिला विभाग प्रमुखपदी निवड जाहीर करण्यात आली. तसेच, विविध मागणींबाबत सरकार ने सकारात्मक निर्णय न घेतल्यास २५ फेब्रुवारी रोजी जिल्ह्याधिकारी कार्यालय समोर आंदोलन करून सरकार जगाव देशभर करण्याचा निर्णय करण्यात आला आहेत.




## पोलिसांकडून रंगांचे सिलिंडर जप्त

**पनवेल** : रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या मतमोजणीला सोमवारी सुरुवात होताच विजयी उमेदवार जाहीर झाले. निकालानंतर पनवेल शहरात कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात विजयाचा जल्लोष साजरा केला. मात्र, या जल्लोषादरम्यान सिलेंडरमधून विविध रंग हवेत उडवण्यात आल्याने परिसरातील नागरिकांना तसेच कर्तव्यावर असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचार्‍यांना मोठा त्रास सहन करावा लागला. रंगामुळे श्वसनाचा त्रास, डोळ्यांना जळजळ होण्याच्या तक्रारी समोर आल्या. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीसांनी तात्काळ हस्तक्षेप करत रंग उडवण्यासाठी वापरण्यात येणारे सिलिंडर ताब्यात घेतले. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीसांनी खबरदारीचे पाऊल उचलले असून नागरिकांनी संयम राखण्याचे आवाहन करण्यात आले.

**खासगी प्राथमिक शाळांचा निधी थकीत** | **शिक्षण विभागाकडून माहिती देण्यास टाळाटाळ**

# आरटीई प्रतिपूर्ती अनुदान लाल फितीत




**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत २५ टक्के राखीव जागांवर आर्थिकदृष्ट्या दुर्बल व मागास वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा गाजावाजा शिक्षण विभागाने केला. परंतु, जिल्ह्यातील २०० हून अधिक शाळा आरटीई प्रतिपूर्ती अनुदानापासून वंचित असल्याची माहिती समोर आली आहे. सुमारे २० कोटीहून अधिक निधी थकीत असल्याची माहिती उघड झाली आहे. मात्र, शिक्षण विभागाकडून याबाबत माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात आली. त्यांच्या या कारभाराबाबत संशय व्यक्त केला जात आहे.

आर्थिक दृष्ट्या दुर्बल व मागास वर्गीय घटकातील विद्यार्थ्यांना खासगी विनाअनुदानीत शाळांमध्ये इंग्रजीचे शिक्षण दर्जेदार मिळण्यासाठी व शिक्षणाच्या प्रवाहात टीकून ठेवण्यासाठी शासनाने आरटीई म्हणजे शिक्षण हक्क कायद्यांतर्गत २५ टक्के राखीव जागांवर विद्यार्थ्यांना शिक्षण देणे बंधनकारक केले. विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क भरण्याची जबाबदारी शासन घेते. सुमारे १७ हजार रुपये प्रमाणे शाळांना अनुदान शासनाकडून दिला जातो. जिल्ह्यामध्ये २६४ हून अधिक खासगी प्राथमिक शाळा आहेत. त्यातील दोनशेहून अधिक शाळांमधील सुमारे अडीच हजारहून अधिक विद्यार्थ्यांची शिक्षण हक्क कायद्यांतर्गत २५ टक्के राखीव जागांवर नियुक्ती करण्यात आली होती. या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाले. मात्र, वर्ष संपत आले तरी शासनाकडून जिल्ह्यातील खासगी शाळांमधील आरटीई प्रतिपुर्ती अनुदान अद्याप मिळाला नाही. यावर्षीचा सुमारे २२ कोटी रुपयांचा अनुदान थकीत असल्याची माहिती समोर आली आहे. शासनाकडून आरटीई प्रतिपुर्ती अनुदान न मिळाल्याने खासगी प्राथमिक शाळांना त्यांच्या खर्चाचा ताळमेळ जुळविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

मागास व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या दर्जेदार शिक्षणाचा गाजावाजा करण्यात आला आहे. मात्र, त्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्याने हा दिखावा कशासाठी? असा सवाल जनतेकडून उपस्थित केला जात आहे.

### शिक्षणाधिकार्‍यांचा फोन स्विच ऑफ

**शिक्षण हक्क कायद्यांतर्गत मागास वर्गीय तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना २५ टक्के राखीव जागांवर शिक्षण देणे बंधनकारक केले. मात्र, प्रतिपूर्ती अनुदान अद्याप आले का नाही, याबाबत विचारणा करण्यासाठी तसेच थकीत अनुदानाबाबत माहिती घेण्यासाठी शिक्षणाधिकारी यांच्याशी संपर्क साधला. सुरुवातीला फोन चालू होता. त्यानंतर काही वेळात फोन स्वीच ऑफ झाला.**

### आरटीई अंतर्गत प्रतिपूर्ती अनुदानावर दृष्टीक्षेप (अंदाजे)

**शाळांची संख्या - २००**
**विद्यार्थी प्रवेश संख्या- २५००**
**शासनाकडून मिळणारा निधी- २२ कोटी रुपये**

## जावयाकडून सासूला मारहाण

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

जावयाने सासूला मारहाण केल्या प्रकरणी खांदेश्‍वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टेंभोडे येथील ४५ वर्षीय महिला नवीन पनवेल येथील गार्डनमध्ये साफसफाई करत होत्या. त्यावेळी त्यांचा जावई आला आणि त्याने तुमच्या मुलीला मस्ती आली आहे, असे बोलून लोखंडी सळईने त्यांना मारहाण केली. त्यांना गंभीर जखमी करून तो पळून गेला. जखमी महिलेवर प्राचीन हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत.

# हे धुके त्वरीत दूर करा

अजितदादा पवार यांच्या अपघाती मृत्यूला आता बारा दिवस झाले आहेत. मात्र याबाबतच्या शंका संपलेल्या नाहीत. घटना इतकी अकस्मात झाली की, आजही त्यावर विश्वास ठेवणे अनेकांना कठीण जाते. मोटार कारच्या अपघातात बरेच पुरावे मिळू शकतात. मुळात अपघात जमिनीवर होत असल्याने त्याची कारणे शोधणे सोपे असते. विमान अपघातात ते सोपे नसते. त्यातही जगभरातील आकडेवारी सांगते की विमानांच्या उड्डाणांपेक्षा त्यांचे जमिनीवर परत येणे व सुरक्षितपणे उतरणे अधिक कठीण असते. सुमारे १० हजार फुटांवरून विमानाला खाली घेऊन येणे व गुरुत्वाकर्षणावर मात करून सावकाशपणे उतरवणे हे आव्हानात्मक असते. त्यावेळी हवेशी घर्षण होऊन खूप मोठी उर्जा तयार होत असते. शिवाय वेगही नियंत्रित करावा लागतो. दादांच्या विमानाच्या इंजिनाचे किंवा वैमानिकाचे नक्की काय चुकले याचा शोध घेण्याचे काम सध्या चालू आहे. हा घातपात नसून अपघात होता असे शरद पवारांनी दुसऱ्याच दिवशी सांगून टाकले. पण त्यांच्या तसेच अजितदादांच्या पक्षाचे नेतेही त्यावर विश्वास ठेवायला तयार नाहीत. विमानात सहा प्रवासी होते, पण पाचच जणांचे मृतदेह कसे असा सवाल अमोल मिटकरी यांनी केला आहे. तर बीडच शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनावणे यांनी विमानात बॉंब तर नव्हता ना असा सवाल करून नव्या वादाला तोंड फोडले आहे. विशेष म्हणजे रोहित पवार यांनीही याला अप्रत्यक्ष पाठिंबा दिला आहे. बॉंब नसला तरी दुसरे काहीतरी संशयास्पद आहे असे ते म्हणतात. या विमानाचा पायलट वारंवार बदलण्यात आला होता, जो पायलट त्या दिवशी कामावर होता त्याला पूर्वी दारुपान केल्याच्या कारणावरून शिक्षा झालेली होती असेही तपशील बातम्यांमधून आले आहेत. ते सर्वच खरे किंवा पूर्ण खोटे नाहीत. विमानाचे हे मॉडेल जुने असून हे मॉडेल तयार करणे कंपनीने दहा वर्षांपूर्वी बंद केले असे म्हणतात. त्यामुळे त्याचे सुटे भाग मिळणे व दुरुस्ती हे कठीण झाले असल्याचीही चर्चा आहे.

### वैमानिकाचा अंदाज चुकला?

सर्वात महत्वाची चर्चा बारामतीच्या विमानतळासंदर्भातील आहे. बारामतीची धावपट्टी ही कच्ची होती. तिथे मुंबईसारख्या विमानतळांप्रमाणे एअर ट्रॅफिक कंट्रोलर वगैरे नव्हते. वैमानिकाला हवेतून दिशा दाखवण्यासाठी लाईट्स वगैरेही नव्हते. बारामतीत एक वैमानिकांना प्रशिक्षण देणारी संस्था आहे. तिचे चालक वा तेथे शिकणारे पायलटच येणाऱ्या व जाणाऱ्या विमानांसाठी हे काम करीत असत. बारामतीत इतर सर्व क्षेत्रात जगातील अत्याधुनिक तंत्रज्ञान आणले गेले. मुंबई, दिल्ली इत्यादींचे विमानतळ चालवणारे अदानी हे पवारांचे घनिष्ठ मित्र. तरीही बारामती विमानतळ अत्याधुनिक करण्याची गरज ना शरद पवारांना ना अजितदादांना भासली होती. येथे विमाने सर्रास ये-जा करीत होती. अपघात झाला त्यादिवशी इतकेही धुके नव्हते की वैमानिकाला काहीच दिसू नये. वेळ सकाळी आठ वाजताची होती. तरीही समजा त्याला खालचा मार्ग दिसला नाही असे गृहित धरले तर त्याने सोलापूर किंवा पुण्याकडे जायला हवे होते. त्याऐवजी त्याने विमान उतरवण्याची जोखीम घेतली. दुसरे म्हणजे विमान नेहमीपेक्षा अधिक आवाज करीत होते आणि ते भयंकर वेगाने खाली आले असे अपघात प्रत्यक्ष पाहणाऱ्यांचे म्हणणे आहे. अपघातानंतर लगेचच टीव्ही वाहिन्यांशी बोलताना अनेक लोकांनी तसे सांगितले होते. म्हणजेच त्यात तथ्य असावे. विमान खाली येतानाच विमानात काही बिघाड झाला असावा अशीही शक्यता आहे. यावेळी वैमानिकाने अत्यंत धोक्याचा असा इशारा, ज्याला सांकेतिक भाषेत मे डे कॉल म्हणतात, तो दिला की नाही याबाबत त्या दिवशी वेगवेगळ्या बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. मात्र विमान खाली येताना सहवैमानिकाने काहीतरी चुकले असल्याचे उद्गार काढलेले ऐकू येतात. विमान वेगाने खाली येऊ लागल्यानंतर आपण योग्य धावपट्टीवर उतरत नसल्याचे वैमानिकांच्या लक्षात आले. मात्र त्यानंतर विमानाला उलटे वळवून पुन्हा हवेत उडवणे त्यांना शक्य झाले नाही असा प्राथमिक अंदाज आहे. मात्र मुळात वैमानिकाचा अंदाज कोणत्या गोष्टीमुळे चुकला असावा हेच कोडे आहे. कारण बारामतीचा विमानतळ हा काही हॉंगकॉंग किंवा मंगळुरु विमानतळासारखा सुमुद्राजवळच्या चिंचोळ्या पट्टीवर उभारलेला नाही. तो उघड्या माळरानावर आहे. दुसरे म्हणजे या विमानतळावर हा वैमानिक किंवा सहवैमानिक अनेकदा आलेले असण्याची शक्यता आहे. म्हणजे इथल्या परिस्थितीची त्यांना कल्पना असावी असे मानायला जागा आहे. तरीही अंतिम क्षणी नेमके काय झाले हे अजून तरी गूढ आहे. जे विमान मुंबईहून काहीही अडचण न येता बारामतीपर्यंत आले ते अचानक असे कोसळावे यामुळे हे गूढ वाढले आहे.

### पत्रकार परिषद घ्या

या स्थितीत या अपघाताबाबत युध्दपातळीवर चौकशी करून तिचा अहवाल सर्वांसमोर ठेवला जाण्याची अत्यंत गरज आहे. अन्यथा याबाबत संशयाचे धुके वाढत जाईल व नागरिकांमधील तर्कवितर्कांची विमाने अधिकाधिक उंच उडत राहतील. दादांच्या विमानातील ब्लॅक बॉक्स मिळाली आहे. त्यात वैमानिकांचे शेवटच्या क्षणीचे आपसातले संभाषण तसेच त्यांनी विमान कोसळणे थांबवायला काय प्रयत्न केले याची माहिती उपलब्ध होईल. त्यावरून नेमक्या कारणाचा अंदाज बांधता येईल. पण याला काही काळ जावा लागेल. केंद्रीय हवाई वाहतूक यंत्रणेमार्फत याची चौकशी सुरू असून याचा अहवाल महाराष्ट्र सरकारलाही दिला जाईलच. पण हे होईपर्यंत मधल्या काळात संशयाचे धुके दूर करण्यासाठी जनतेच्या मनात जे प्रश्न आहेत त्यांची संगतवार व स्पष्ट उत्तरे देणे शक्य आहे. त्यासाठी मुख्यमंत्र्यांनी हवाई वाहतूक खात्यातील अधिकारी व तज्ज्ञांची एक पत्रकार परिषद आयोजित करायला हवी. यापूर्वी अहमदाबादमध्ये एअर इंडियाचे विमान कोसळले तेव्हाही असंख्य प्रकारचे संशय व्यक्त केले गेले होते. ते आजही फिटलेले नाहीत. त्या चौकशीचा अहवाल कधी येईल हे कोणीही सांगू शकत नाही. अशा वेळी अपघातासंदर्भात जे विविध तर्क केले जातात त्याबाबत खुलासा करणे व कोणत्या गोष्टी ब्लॅक बॉक्स वगैरेंच्या चौकशीत स्पष्ट होतील हे समजावून सांगणे हे सरकारचे काम आहे. अजितदादांच्या संदर्भात तर याचे महत्व कितीतरी अधिक आहे. त्यांच्या मृत्यूनंतर अवघ्या चारच दिवसात ज्या प्रकारचे राजकारण चालू झाले आहे ते पाहता याची अधिकच गरज आहे. आम्ही यापूर्वी म्हटल्याप्रमाणे बारामतीतील दुर्घटना ही अपघातच असण्याची शक्यता आहे. परंतु त्या दिवशी अपघात होताक्षणी हा घातपात आहे व राजकीय कारणास्तव तो घडवून आणला गेला अशी प्रतिक्रिया उमटली. सध्याच्या भाजप सरकारची प्रतिमा लोकांच्या मनात कशी आहे हे दर्शवणारा हा प्रकार आहे. विशेष म्हणजे आता बारा दिवसांनंतर घातपाताच्या शंकेमध्ये मान्यवर नेतेही भर घालू लागले आहेत. त्यामुळे याचा लवकरात लवकर खुलासा करणे ही सरकारची जबाबदारी आहे.

विचार

# डिजिटल प्रतिकृती हे उद्याचे आभासी वास्तव

***डिजिटल ट्विन तंत्रज्ञान एखादी भौतिक वस्तू किंवा प्रक्रियेचे तपशीलवार आभासी प्रतिनिधित्व तयार करते. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे डिजिटल क्षेत्र आणि वास्तविक जगाचे एकत्रिकरण होऊन डिजिटल ट्विन तंत्रज्ञान एक अपरिहार्य साधन म्हणून उदयाला आले आहे. या तंत्रज्ञानामुळे उद्योगांना आकार मिळत असून व्यवहारांमध्येही क्रांती घडते आहे. आभासी जग आणि भौतिक वास्तवासाठीही हे तंत्रज्ञान वापरात येणार आहे.***




**डॉ. दीपक शिकारपूर**

सयामी जुळे वा जुळ्या व्यक्तीबद्दल आपण जाणतो. साधारण एकमेकांसारखेच दिसणारे आणि काही वेळा एकसारखाच विचार करणारे ते एक व्यक्तिमत्व असते. अनेक वेळा जुळे इतके सारखे दिसतात की कोण कुठला हेही ठरवणे अवघड जाते. हे झाले भौतिक विश्वाबद्दल. आता घटकाभर कल्पना करा की आपली एक प्रतिकृती डिजिटली तयार झाली तर? या प्रतिकृतीला डिजिटल ट्वीन (जुळे) असे म्हटले जाते. एखाद्या वस्तूचा डिजिटल ट्विन म्हणजे तिची आभासी प्रतिकृती. ही प्रतिकृती मूळ वस्तू/व्यक्तीची इत्यंभूत माहिती मिळवून पूर्ण जीवनचक्राचे सदृशीकरण (सिम्युलेशन) करते. डिजिटल ट्विन हे एखाद्या वास्तविक वस्तूचे, प्रणालीचे किंवा प्रक्रियेचे अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिबिंब असते. हे प्रतिबिंब सॉफ्टवेअरच्या सहाय्याने तयार केले जाते आणि वास्तविक वस्तूच्या सर्व वैशिष्ट्यांचे अनुकरण करते.

डिजिटल ट्विन हे एक अत्याधुनिक तंत्रज्ञान आहे, जे एखाद्या भौतिक वस्तू, प्रणाली किंवा प्रक्रियेचे अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिनिधित्व तयार करते. या आभासी प्रतिनिधित्वालाच डिजिटल ट्विन म्हणतात. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे डिजिटल क्षेत्र आणि वास्तविक जगाचे एकत्रिकरण झाले आहे. यामुळे डिजिटल ट्विन तंत्रज्ञान एक अपरिहार्य साधन म्हणून उदयाला आले आहे. या तंत्रज्ञानामुळे उद्योगांना आकार मिळतो आहे, व्यवहारांमध्येही क्रांती घडते आहे. सुरुवातीच्या काळात फक्त उत्पादनाच्या स्तरावर याची कल्पना केली होती. पण आता आभासी जगात आणि भौतिक वास्तवांसाठीही हे डिजिटल तंत्रज्ञान वापरात येणार आहे. डिजिटल ट्विन हा शब्द सगळ्यात पहिल्यांदा मिशिगन विद्यापीठात डॉ. मायकेल ग्रीव्हस यांनी २००२ मध्ये सादर केला होता. सुरुवातीच्या काळात उत्पादन क्षेत्रात ही संकल्पना मांडण्यात आली होती. त्यानंतर ही कल्पना मोठ्या प्रमाणात ॲप्लिकेशन्सचा समावेश करण्यासाठी विकसित झाली. डिजिटल ट्विनमध्ये विविध परिस्थितींचे अनुकरण करून आणि डेटाचे विश्लेषण करून भविष्यसूचक देखभाल, परिपूर्ण व्यवहार आणि उत्पादन विकासामध्ये नाविन्य आणले जाते. भौतिक मालमत्ता आणि प्रक्रियांच्या कामगिरीचे परीक्षण, विश्लेषण आणि त्याची क्षमता वाढवण्यासाठी उत्पादन, आरोग्यसेवा, वाहतूक आणि शहरी नियोजन यासारख्या विविध उद्योगांमध्ये डिजिटल ट्विन्सचा वापर केला जातो. हे तंत्रज्ञान वेगवेगळ्या परिस्थितींची पडताळणी करू शकते, त्याच्या परिणामांचा अंदाज लावू शकते आणि निर्णय घेण्यासाठीही मदत करू शकते. मेटाव्हर्समध्ये एक आभासी जागा तयार केली जाते. यामध्ये वापरकर्ते डिजिटल वातावरणाशी आणि एकमेकांशी संवाद साधतात आणि डिजिटल ट्विनिंगला अनेक प्रकारे छेदतात. मेटाव्हर्स विकसित होत असताना समग्र आणि एकमेकांशी जोडलेले आभासी जग तयार करण्यासाठी डिजिटल ट्विन कणा म्हणून काम करू शकतात. हे तंत्रज्ञान वापरकर्त्यांना मेटाव्हर्समध्ये स्वतःचे अत्यंत तपशीलवार आणि अचूक प्रतिनिधित्व तयार करण्यास सक्षम बनवू शकते. यामुळे वैयक्तिक स्वरूपाचे आणि खरे असल्यासारखे अनुभव घेता येतात. उदाहरणार्थ, व्हर्च्युअल शॉपिंगमध्ये उत्पादनांचे डिजिटल ट्विन्स खरेदीचे निर्णय घेण्यासाठी वापरकर्त्यांना मदत करू शकतात. शिवाय डिजिटल ट्विन्स मेटाव्हर्समधील विविध मंच आणि यंत्रणांमधील देवाणघेवाण सुलभ करतात. तसेच विविध आभासी वातावरणांमध्ये अखंड संवाद आणि परस्परसंवादही घडवून आणतात. या देवाणघेवाणीमुळे परस्परसंबंधित अनुभव घेता येतात आणि जागतिक स्तरावर सहयोग आणि नवकल्पना वाढीला लागते. डिजिटल ट्विन्स विविध क्षेत्रांमध्ये खोली, समृद्धता आणि कार्यक्षमता वाढवून मेटाव्हर्सचा लक्षणीय विस्तार करू शकतात. याव्यतिरिक्त स्मार्ट शहरे, औद्योगिक संयंत्रे किंवा नैसर्गिक वातावरण यासारख्या संपूर्ण इकोसिस्टीमचा समावेश करण्याच्या उद्देशाने डिजिटल ट्विन वैयक्तिक प्रतिनिधित्वाच्या पलीकडे विस्तारू शकतात. रिअल-टाइम डेटा आणि सिम्युलेशन एकत्र करून हे तंत्रज्ञान बहुआयामी आणि प्रतिसादात्मक आभासी जग आणखी सक्षम करते. यामुळे त्यांच्या भौतिक समकक्षांना जवळून प्रतिबिंबित करता येते. डिजिटल जुळे डेटा स्त्रोतांशी जोडलेले असतात. परिधान केलेल्या एका छोट्या उपकरणाद्वारे आपले डिजिटल विश्व साठवले जाते, आपण भेटलेल्या व्यक्ती, त्यांचे सोशल प्रोफाईल्स, झालेले संभाषण, व्यवहार या सर्व बाबींचा त्यात अंतर्भाव असतो. अनेक वर्षांच्या साठवणुकीनंतर या माहितीचे एआय तंत्राद्वारे पृथक्करण करून काही विशिष्ट साचे, वर्तणुकीचे प्रकार तयार केले जातात. या संकल्पनेचा उपयोग आपल्याला स्मरण केलेल्या गोष्टी साठवण्यासाठी करता येऊ शकतो. मानवी मेंदूमध्ये ही अफाट क्षमता आहे. पण कालानुरूप त्यात त्रुटी निर्माण होतात. अनेकांना विस्मरण होते, एखादी व्यक्ती समोर येते पण नाव आठवत नाही. कधी कधी नाव आठवते, पण व्यक्ती डोळ्यासमोर येत नाही. इथे आपला डिजिटल जुळा आपल्याला मदत करू शकतो. एआय मधील प्रेडिक्टिव्ह अॅनॅलिटीक्स तंत्रामुळे आपण एखाद्या व्यक्तीला वा एखाद्या ठिकाणी जायच्या आधी त्यासंबंधी माहितीची खातरजमा, उजळणी आधीच करू शकतो. काही टूल्स तुम्हाला हवी तेव्हा रिअलटाइम अर्थात मदत करू शकतात. आपला घसा बसला असेल तर, आपल्या वतीने संभाषणही करू शकतात. यात आपल्या आवाजाचे, लकबींचे पृथक्करण केले असते. फक्त यासाठी आपले संभाषण (अनेक वर्षांचे) रेकॉर्ड केले जाते. यासाठी वेअरेबल (परिधान केलेले संगणकीय उपकरण) वापरले जाते. 'प्लॉड' या एआय उद्योगाने नोट नावाचा एक स्लिम सक्षम ऑडिओ रेकॉर्डर विकसित केला आहे.

हा ऑडियो तुमच्या फोनच्या मागील बाजूस अडकवला जाऊ शकतो किंवा तुमचे संभाषण रेकॉर्ड करण्यासाठी, हावभाव रेकॉर्ड करण्यासाठी आणि सारांशित करण्यासाठी शर्टच्या खिशात ठेवला जातो. हे तंत्र नेहमी तुमचे संभाषण ऐकते आणि कालांतराने तुमचे व्यक्तिमत्त्व, तुमचा प्राधान्यक्रम, संवाद जाणून घेत काही वर्षात तुमचे डिजिटल जुळे तयार करते. या तंत्रात आणि चॅटजीपीटीसारख्या जनरेटिव्ह एआय टूल्स मध्ये बराच फरक आहे. चॅटजीपीटी सार्वत्रिक डिजिटल माहितीसंग्रहाचे पृथक्करण करते आणि माहिती निर्माण करते. इथे तसे नाही, फक्त आपला डिजिटल ट्वीन आपल्याशी संबंधित माहितीचे पृथक्करण करतो आणि गरज पडल्यास आपली जागादेखील घेतो. यामुळे आपल्या मानवी मेंदूच्या क्षमता कमी होतील असे काहीजणांना वाटते. गुगल मॅप वापरून आपण दिशा शोधतो. इच्छित स्थळ शोधतो. पूर्वी आपण स्मरणशक्तीला ताण देऊन विचारत विचारत एखादा पत्ता शोधत असू. एकदा कष्टाने पत्ता शोधला की कायम लक्षात राहत असे. आता हेच तंत्र सर्वत्र हातपाय पसरू लागले आहे. यामुळे भविष्यात माणसाचे आयुष्य नक्कीच सुसह्य होणार आहे. फक्त एक मोठा धोका आहे तो सुरक्षेचा. आपल्याबद्दल सर्व माहिती सायबर गुन्हेगारांनी चोरली तर ते दुरुपयोग करू शकतात. सर्वच तंत्रांना असा धोका असतोच. त्यामुळे जास्त काळजी घेतली पाहिजे हे वास्तव आहे. तंत्रज्ञान चहु दिशांनी विस्तारत असून प्रगतीची नवनवी कवाडे उघड होत आहेत. त्यातून नित्य नेमाने नवे तंत्रज्ञान जुन्या तंत्रज्ञानाची जागा घेत आहे. यातूनच मानवी विकासाला नवी दिशा मिळत आहे. त्याचा सगळ्यात मोठा फायदा उद्योग आणि सेवाजगत घेत आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्र अशाचे भराऱ्या घेत राहणार आहे. त्यात तगण्यासाठी आणि स्वविकास साधण्यासाठी तंत्रज्ञांबरोबरच सामान्यांना आणि युवा पिढीला सतत तयारीत रहावे लागणार आहे.

deepak@deepakshikarpur.com

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

# शाळा पुन्हा ओसाड



**प्रमोद जाधव**

पटसंख्येअभावी बंद पडलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळा पुन्हा उघडण्यात आल्या. रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या मतदानासाठी केंद्र म्हणून त्यांची वापर करण्यात आला. गरज सरो आणि वैद्य मरो अशी अवस्था या शाळांची झाली आहे. आता या शाळांकडे कोणीही पाच वर्ष बघणार नाही. निवडणूक आल्यावर शाळांची आठवण पडणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या ३०० हून अधिक शाळा ओस पडणार आहेत. जिल्हा परिषद शिक्षण विभागाने या शाळांमध्ये उपक्रम राबविल्यास शाळा सुरू राहण्यास मदत होणार आहे.

रायगड जिल्ह्यात सध्या जिल्हा परिषदेच्या सुमारे अडीच हजारहून अधिक शाळा आहेत. या शाळांमध्ये सुमारे ९५ हजारहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. गाव तेथे शाळा हा शासनाच्या उपक्रमातून गावागावात शाळा बांधण्यात आल्या. मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी जिल्हा परिषदेने वेगवेगळे उपक्रम राबविले. दप्तराविना शाळापासून शाळा समिती स्तरावर गणवेश घेण्याच्या सुचना देण्यात आल्या. त्यानुसार वेगवेगळ्या शाळेत गणवेश विद्यार्थ्यांना देण्यात आले. शाळा बाह्य विद्यार्थ्यांना शोधून त्यांना शाळेच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. परंतु जिल्हा परिषद शिक्षण विभागाला पटसंख्या स्थिर ठेवता आली नसल्याने शाळेतील विद्यार्थ्यांची गळती वाढत गेली. त्यामुळे पटसंख्ये अभावी जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाला घ्यावा लागला. पटसंख्ये अभावी जिल्ह्यातील ३०० हून अधिक जिल्हा परिषदेच्या शाळा बंद पाडण्यात आल्या. या शाळेतील विद्यार्थ्यांना अन्य शाळेत हालविण्यात आले. त्यामुळे या बंद पडलेल्या शाळा ओस पडल्या. गेल्या पाच वर्षात बंद पडलेल्या शाळांकडे कोणीही फिरकला देखील नाही. त्यामुळे शाळाचा परिसरात गवत वाढणे, दारे, खिडक्या खराब होणे, भिंतीना तडे पडणे, भिंतीवरील रंग उडणे अशी बिकट अवस्था झाली. रायगड जिल्हयातील अलिबाग, पेण, पनवेल, उरण, महाड, श्रीवर्धन, कर्जत सात विधानसभा मतदारसंघाचे मतदान २० नोव्हेंबर २०२४ ला झाले. मतदान केंद्र सुसज्ज असणे आवश्यक आहे. त्यामुळे बंद पडलेल्या शाळांची दुरुस्ती करण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाला प्रचंड मेहनत घ्यावी लागली. शाळांमधील परिसर स्वच्छ करण्याबरोबरच उभारण्यात येणाऱ्या मतदान केंद्रावर अधिकारी व कर्मचाऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी तयारी करण्यात आली होती. शाळांमध्ये पाणी, वीज, स्वच्छतागृह अशा सुविधा उपलब्ध करण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभाग कामाला लागले होते.मतदानामुळे जिल्ह्यातील तीनशेहून अधिक जिल्हा परिषदेच्या शाळा आता पुन्हा बोलक्या झाल्या होत्या. विधानसभेच्या निवडणुकीनंतर पुन्हा या शाळा बंद ठेवण्यात आल्या. पंधरा महिन्यानंतर पुन्हा जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका झाल्या. जिल्हा परिषदेच्या५९ व पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी दोन हजार ३२३ मतदान केंद्रावर शनिवारी (दि७) मतदान झाले. या मतदानासाठी पुन्हा बंद पडलेल्या शाळा सुरु करण्यात आल्या. या बंद पडलेल्या शाळांची केंद्र म्हणून निवड करण्यासाठी त्यांची देखभाल दुरुस्ती करण्यात आली. शनिवारी मतदान झाल्यावर पुन्हा या शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत. त्या आता ओस पडल्या आहेत. पुन्हा शाळेच्या परिसरात कचरा साचणार आहे. गवत झुडपांचा विळखा होणार आहे. पत्रे, भिंती खराब होणार आहेत. त्यामुळे निवडणूकांचा कार्यक्रम लागे पर्यंत या बंद पडलेल्या शाळांकडे कोणाही आता फिरकणार आहे. फक्त निवडणुकांपुरता या शाळांचा वापर केला जात आहे. त्यासाठी लाखो रुपये खर्च केले जात आहे. गरज सरो आणि वैद्य मरो या भुमिकेतून बंद पडलेल्या शाळांचा वापर होत आहे. ही मोठी चिंतेची बाब आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी करोडो रुपये खर्च करून जिल्हा परिषदेच्या शाळा बांधण्यात आल्या आहेत. गावांतील गरीब, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील मुला मुलींना प्राथमिक शिक्षण मिळावे, यासाठी शाळा बांधण्यात आल्या. परंतू पटसंख्ये अभावी शाळा बंद झाल्या. या शाळा पुन्हा सुरु ठेवण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविणे गरजेचे आहे. तरच या शाळा बोलक्या राहतील. शिक्षण विभागाने बंद पडलेल्या शाळांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. जिल्ह्यात उमेद मार्फत हजारो बचत गट तयार केले आहेत. या बचत गटामार्फत बंद पडलेल्या शाळांच्या इमारतींचा वापर वेगवेगळ्या उपक्रमांसाठी दिल्यास या शाळा बोलक्या राहतील. गावातील ग्रामस्थांच्या मदतीने बंद पडलेल्या शाळांमध्ये सामाजिक, शैक्षणिक सारखे उपक्रम घेतल्यास शाळांमधील किलबिलाट कायम सुरु राहण्यास मदत होईल.

लोकसंसद

## महाशिवरात्रीला शिवभक्ती करुया

माघ वद्य चतुर्दशी हा भगवान शिव देवतेचा ध्यानातून समाधीकडे जाण्याचा काळ असतो. या काळात शिव तत्व वातावरणातील हलाहल म्हणजे रज-तम स्वीकारत नाही. साहजिकच रज-तमाचे वातावरणतील प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढते आणि त्याचा त्रास मानवाला होऊ नये यासाठी हिंदू धर्मात महाशिवरात्री हे व्रत सांगितले आहे. व्रतस्थ रहाणे, पवित्र जलाने स्नान करणे, संकल्प सोडून उपवास व जागरण करणे आणि शिवपूजन करणे ही या व्रताची प्रमुख अंगे आहेत. या दिवशी शिवोपासना अधिकाधिक करावी. ज्यामुळे आपल्याकडून शिवतत्व अधिक प्रमाणात ग्रहण होईल व रज - तम युक्त वातावरणापासून आपले रक्षण होईल. शिव तत्व आकर्षित करणारी रांगोळी काढणे, ॐ नमः शिवाय हा नामजप सतत करणे, शिव मंदिरात जाऊन नंदी दर्शन, शृंगदर्शन, शिवपूजन करणे, शिवाला थंड जल, दूध किंवा पंचामृताने स्नान व अभिषेक करणे, पांढऱ्या अक्षता, पांढरी फुले, बिल्वदल, भस्म यांसह शिवाचे पूजन करणे, केवडा किंवा चमेलीचे अत्तर अर्पण करून उदबत्तीने ओवाळणे, शिवपिंडीला सोमसूत्री प्रदक्षिणा घालणे या कृतींमुळे शिवतत्व अधिक आकर्षित होते. हिंदूधर्मातील प्रत्येक सण आणि व्रत हा विज्ञानावर आधारित आणि ईश्वर प्राप्तीच्या दिशेने पुढे नेणारा आहे. पण तो साजरा करताना आपण अंतर्मुख असणे अपेक्षित आहे. उंची, रंगीबेरंगी वस्त्रे, चित्रविचित्र केशभूषा, प्रेक्षणीय दिसण्यासाठीच्या हालचाली व चेहर्यांवरीत रंगरंगोटी यांमुळे स्वतःसह इतरांचीही वृत्ती बहिर्मुख होते. यापेक्षा शबरी, भक्त प्रल्हाद, धृव बाळ यांचे चेहरे आठवून आपण त्यांच्या सारखी भक्ती एक दिवस तरी करूया.

**- छाया मिराशी, पुणे**

दिनविशेष

# जागतिक दर्जाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातीलच नाही तर जगातील एक नावाजलेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजी झाली म्हणजे आज हे विद्यापीठाला ७७ वर्ष पूर्ण होऊन ७८ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. डॉ एम आर जयकर हे या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. स्थापनेनंतर १२ जिल्ह्यांमध्ये उच्च शिक्षणाच्या विविध सुविधा पुरवण्याची जबाबदारी पुणे विद्यापीठावर होती. १९६४ मध्ये कोल्हापूर येथे छत्रपती शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पुणे, नाशिक, धुळे, जळगाव या जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचे कार्य सुरू झाले. १९९० साली जळगाव येथे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर पुणे, नगर, नाशिक या जिल्ह्यांसह दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील महाविद्यालये या विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहेत. २०१४ साली या विद्यापीठाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला. पुण्यातील गणेशखिंड रस्त्यावर पुणे विद्यापीठाचे मुख्य संकुल आहे. विद्यापीठाची मुख्य इमारत पुणेकरांसाठी शैक्षणिक अस्मितेचे प्रतीक आहे. ही इमारत ब्रिटिश गव्हर्नरांच्या पुण्यातील मुक्कामासाठी एकोणिसाव्या शतकात बांधण्यात आली होती. इटालियन शैलीत बांधण्यात आलेली ही इमारत म्हणजे पुण्याला मिळालेला ऐतिहासिक वारसा आहे. विद्यापीठाचा परिसर सुमारे ४९० एकराचा असून त्यात अनेक दुर्मिळ सुंदर आणि अतिशय मनमोहक असे वातावरण लाभले आहे. घनदाट जंगल, शोभिवंत हिरवळ, दुर्मिळ ब्रिटिशकालीन कारंजे व ऐतिहासिक अशी ब्रिटिशकालीन भव्य इमारत यामुळे हा परिसर निसर्गप्रेमी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक यांचे आकर्षण केंद्र राहिला आहे. पुणे विद्यापीठात दुर्मिळ तसेच सावली देणारे मोठे वृक्ष आहेत. या वृक्षांची छाया, सौंदर्य आणि उत्साह निर्माण करणारे वातावरण विद्यार्थ्यांना अभ्यास व संशोधन करण्यास प्रोत्साहित करते. विद्यापीठातून विविध पदव्युत्तर विभाग व प्रशासकीय कार्यालयाचे कामकाज चालते. या विभागातून आज जवळपास ६ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ४२ शैक्षणिक विभाग, १२ आंतरविद्या शाखा व सेवा युनिट, २० अध्यासने, ८ राष्ट्रीय व प्रादेशिक केंद्र आहेत. ६९६ संलग्न महाविद्यालये, २८७ मान्यताप्राप्त व्यवस्थापन संस्था, १२१ मान्यताप्राप्त संशोधनकेंद्र विद्यापीठाशी संलग्न आहेत. विद्यापीठातील विविध विभागात ६० हुन अधिक देशातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आपल्या विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठातील अभ्यासक्रमाचेही फायदे व्हावेत यासाठी गेल्या काही काळात विद्यापीठाने परदेशातील नामांकित विद्यापीठांसोबत सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ जयकर यांच्या नावाने ओळखले जाणारे जयकर ग्रंथालय केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर विद्यापीठाबाहेरील संशोधक व अभ्यासकांनाही खेचून आणते. जयकर ग्रंथालय हे माहिती आणि संदर्भ ग्रंथासाठी भारतातीलच नव्हे तर जगातील जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथालयांपैकी एक आहे. जयकर ग्रंथालयात भारतीय व विदेशी मासिके घेतली जातात तसेच ग्रंथालयात काही नियतकालिके मोफत मिळतात. जयकर ग्रंथालयात ५ लाखांहून अधिक पुस्तके व विविध विषयांवरील मासिके आहेत. अशा सुविधांमुळेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातीलच नव्हे तर देशातील विद्यार्थ्यांच्या पहिल्या पसंतीचे विद्यापीठ आहे. पुणे विद्यापीठ ज्ञानाची निर्मिती, संरक्षण आणि प्रसारण करणारे जागतिक दर्जाचे विद्यापीठ आहे.

**- श्याम ठाणेदार**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१० फेब्रुवारी**

१)श्री.बाळाराम भाऊ खरवले अलिबाग १०-०२-१९४०
२)श्री.भानुविलास दत्तात्रेय म्हात्रे अलिबाग १०-०२-१९५३
३)श्री.रजनीकांत बामा सखे नवेदर, अलिबाग१०-०२-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# बोगस आदिवासी विद्यार्थ्यांचा शोध सुरु

## ●जातवैधता प्रमाणपत्रांची छाननी करणार; आदिवासी विकास विभागाचा निर्णय

**| मुंबई | प्रतिनिधी |**

चालू शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमात अनुसूचित जमातीच्या कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची जातवैधता प्रमाणपत्र बोगस आढळून आली. यासाठी आदिवासी विकास विभागाने एक महत्वाचा निर्णय घेतला आहे. चालू शैक्षणिक वर्षानंतर आता सन २०२४-२५ या वर्षात आदिवासी कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे तपासली जाणार आहेत. तसेच प्रमाणपत्र, कागदपत्रांची योग्य पडताळणी न करता अशा विद्यार्थ्यांना प्रवेश कसे मिळाले, याची चौकशी करून संबंधित अधिकारी आणि शैक्षणिक संस्थांची जबाबदारी निश्चित केली जाणार आहे. त्यामुळे बोगस जातवैधता प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश मिळवलेल्या आणि यंदा अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य टांगणीला लागण्याची शक्यता आहे.




सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात वैद्यकीय, अभियांत्रिकी, औषधनिर्माण यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमाला अनुसूचित जमातीच्या (एसटी) कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी जवळपास ३२ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी बनावट जातवैधता प्रमाणपत्र सादर केल्याचे आदिवासी विभागाला छाननीत आढळून आले आहे. त्यामुळे विभागाने मागे जात २०२४-२५ या वर्षात आदिवासी कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रांची छाननी करण्याचा निर्णय घेतला आहे. या छाननीतून प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी बोगस जातवैधता प्रमाणपत्राचा आधार घेतला किंवा कसे हे स्पष्ट होणार असल्याचे आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे सांगितले.

व्यवसायिक अभ्यासक्रमांना राखीव प्रवर्गातून प्रवेश घेण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांना प्रवेशावेळी जातवैधता प्रमाणपत्र सादर करावे लागते. चालू शैक्षणिक वर्षात अनुसूचित जमातीच्या कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या जातवैधता प्रमाणपत्राची छाननी केली असता ३२ विद्यार्थ्यांनी सादर केलेले प्रमाणपत्र विभागाकडून जारी करण्यात आले नसल्याचे आढळून आले. तसेच काही विद्यार्थ्यांनी केवळ जातवैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी केलेल्या अर्जाच्या पावतीच्या आधारे प्रवेश घेतल्याचे निष्पन्न झाले.

### कारवाईची मागणी

**बोगस कागदपत्रांच्या आधारे प्रवेश लाटला गेल्याने खऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांवर अन्याय झाला आहे. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याची मागणी विभागाने केली आहे. तसेच काही विद्यार्थ्यांनी केवळ जातवैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी केलेल्या अर्जाच्या पावतीच्या आधारे प्रवेश घेतल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे विभागाने अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याची मागणी करणारे पत्र व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा घेणाऱ्या सीईटी कक्षाच्या आयुक्तांना लिहिल्याची माहिती वाघमारे यांनी दिली.**

## प्रौढाचा बुडून मृत्यू

**गुहागर :** असलम अब्दुल करीम दळवी (५६) हे शुक्रवारी सकाळी नेहमीप्रमाणे ते दारूच्या नशेतच खाडीत खेकडे पकडण्यासाठी घराबाहेर पडले होते. परंतु, सायंकाळ झाली तरी वडील घरी न परतल्यामुळे त्यांचा मुलाने खाडी परिसरात जाऊन शोध घेतला. यावेळी त्याला खाडीच्या पाण्यात ते तरंगताना दिसून आले.

# भटक्या श्वानांसाठी उभारणार निवारा केंद्र

## ● डॉग शेल्टरला शासनाची मंजुरी

**| पालघर | प्रतिनिधी |**

मिरा-भाईंदर शहरातील भटक्या श्वानांचा बंदोबस्त करण्यासाठी महापालिकेने मोठे पाऊल उचलले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, उत्तन-गोराई मार्गावरील सुमारे दीड हेक्टर शासकीय जागा डॉग शेल्टरसाठी महापालिकेला हस्तांतरित करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. याठिकाणी लवकरच ५०० पेक्षा जास्त श्वानांची क्षमता असलेले डॉग शेल्टर उभारले जाणार आहे. यामुळे शहरातील नागरिकांना भटक्या श्वानांपासून दिलासा मिळणार आहे.

मानव आणि श्वान यांच्यातील वाढता संघर्ष आणि उपद्रव टाळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने गेल्या वर्षी सुमोटो याचिका दाखल करून घेतली होती. त्यानुसार, राज्य शासनाने २४ नोव्हेंबर २०२५ रोजी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या नियमांनुसार शैक्षणिक संस्था, रुग्णालये, बसस्थानके आणि रेल्वे स्थानक परिसरातील श्वानांना तात्काळ पकडण्यात येईल. त्यांचे निर्बिजीकरण आणि लसीकरण करून त्यांना डॉग शेल्टरमध्ये ठेवले जाईल. ज्या श्वानांना पकडले जाईल, त्यांना पुन्हा त्याच सार्वजनिक ठिकाणी सोडले जाणार नाही, जेणेकरून नागरिकांची सुरक्षा अबाधित राहील. शहरात डॉग शेल्टरसाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने पालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी १८ डिसेंबर २०२५ रोजी शासनाकडे जागेची मागणी केली होती. उत्तन-गोराई मार्गावरील ही जागा शहर विकास आराखड्यानुसार म्युनिसिपल पर्पज, आरक्षण क्र. ४५ साठी राखीव होती. महसूल विभागाने आता ही जागा महापालिकेकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. ही जागा हस्तांतरित होताच ५०० पेक्षा जास्त श्वानांची क्षमता असलेल्या या शेल्टरचे काम सुरू करण्यात येणार आहे.

# कोट्यवधींचा बेकायदेशीर गुटखा जप्त

**| मुंबई | प्रतिनिधी |**

गुजरातहून मुंबईकडे येणारा तब्बल दोन कोटी रुपयांचा बेकायदेशीर गुटखा समतानगर पोलिसांनी जप्त केला आहे. ही कारवाई समतानगर पोलिसांनी पहाटेच्या सुमारास ठाण्याजवळ करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातहून एक ट्रक मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा घेऊन मुंबईकडे येत असल्याची गोपनीय माहिती समतानगर पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ सापळा रचत ठाण्याच्या हद्दीत संबंधित ट्रक थांबवला. ट्रकची झडती घेतली असता त्यामध्ये विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा मोठ्या प्रमाणावर आढळून आला. प्राथमिक तपासात जप्त करण्यात आलेल्या गुटख्याची बाजारभावानुसार किंमत सुमारे दोन कोटी रुपये इतकी असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, ट्रकच्या बाहेरील कागदपत्रांमध्ये इतर मालाची नोंद दाखवण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात आत बेकायदेशीर गुटख्याची वाहतूक सुरू होती. या प्रकरणी पोलिसांनी ट्रक चालकाला ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहे.




# रोहा रेल्वे स्टेशनवर इंडिकेटरचा अभाव

## ● अपूर्ण निवारा शेड
## ● प्रवाशांचे हाल

**| सुतारवाडी | प्रतिनिधी |**

रोहा रेल्वे स्टेशनमधून दररोज ५० रेल्वेच्या गाड्या धावत असतात. बाहेरून येणाऱ्या दिल्ली-गुजरात-तिरुअनंतपुरम-गोवा या मार्गाकडे सातत्याने रेल्वेच्या गाड्यांना सातत्याने मोठे प्रवासी मिळत असतात. या ठिकाणी दोन प्लॅटफॉर्म आहेत. प्लॅटफॉर्म नंबर एक व प्लॅटफॉर्म नंबर दोन. मात्र दोन्ही प्लॅटफॉर्मला अपूर्ण निवारा शेड आहेत. मुख्य म्हणजे या दोन्ही प्लॅटफॉर्ममध्ये इंडिकेटरची व्यवस्था नाही. त्यामुळे हजारो प्रवाशांना गेल्या अनेक वर्षापासून रेल्वे येण्याअगोदर मोठी धावपळ करावी लागते. विशेषता ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना घेऊन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अचानकपणे जाणे शक्य होत नाही.

या रेल्वे स्टेशनला अनेकवेळा जी एम आणि डी जी एम भेटी देत असतात. मात्र त्यांना प्रवाशांचे हाल दिसत नाहीत. दोन्ही प्लॅटफॉर्मला पूर्णपणे निवाराशीर नसल्यामुळे हजारो प्रवाशांना उन्हाळी व पावसाळी मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या मार्गावरून दररोज हजारो प्रवासी प्रवास करत असतात. त्यातून उत्पन्न हे मोठ्या प्रमाणावर मिळत असते. मात्र प्रवाशांच्या सुविधांकडे रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष असल्यामुळे हजारो प्रवाशांचे हाल होत आहेत. त्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

रेल्वे प्रशासनाने लवकरात लवकर दोन्ही प्लॅटफॉर्मला पूर्ण निवारा शेड, त्याचप्रमाणे इंडिकेटरची व्यवस्था करावी, अशी मागणी हजारो प्रवासी सातत्याने करत आहेत. मात्र त्याकडे रेल्वे प्रशासन दुर्लक्ष करत आहे. या ठिकाणी भेडसावणाऱ्या विविध सुविधा लवकरच उपलब्ध करून द्याव्यात, अशी प्रवासी वर्गाची मागणी आहे.

## साई भंडारानिमित्त विविध कार्यक्रम

**खांब :** रोहा तालुक्यातील सांगडे या गावी दि.११ फेब्रुवारी रोजी साई भंडारानिमित्त विविध प्रकारच्या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. येथील कृषीनिष्ठ व प्रयोगशील शेतकरी तथा साईभक्त केशव खरिवले यांच्या निवासस्थानी गेल्या अनेक वर्षांची यशस्वी परंपरा राखत याही वर्षी सदरील साई भंडारा उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी साई पादुका अभिषेक, श्री सत्तनारायणाची महापूजा, हरिपाठ, सायं.५ ते ६ प्रवचनकार रविंद्र महाराज पाटील चौल यांचे प्रवचन, सायं.७ ते रात्री ९ वाजेपर्यंत हभप किरण महाराज कुंभार, पाली-सुधागड यांचे किर्तन आयोजित करण्यात आले आहे.

# निवासी इमारतीला आग; महिलेचा मृत्यू

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबईतील विलेपार्लेमधील एका निवासी १३ मजली इमारतीत भीषण आग लागली. या आगीत एका ६३ वर्षीय वृद्ध महिलेचा मृत्यू झाला. तर एक महिला जखमी झाली आहे.

विलेपार्ले येथील फिरोजशाह मेहता रोडवर असलेल्या सुविधा पर्ल या १३ मजली इमारतीला सोमवारी सकाळी साडे नऊच्या सुमारास आग लागली. या इमारतीच्या वरच्या मजल्यालाच आग लागली होती. घटनेची माहिती मिळताच घटनेची माहिती मिळताच मुंबई महानगरपालिकेचे अग्निशमन दल, पोलीस, स्थानिक प्रभागाचे कर्मचारी आणि १०८ रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाले. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी



अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी ५ फायर इंजिन,२ जम्बो टँकर, २ अत्याधुनिक वॉटर टँकर, १ हायड्रोलिक प्लॅटफॉर्म आणि १ टर्न टेबल लॅडर अशी यंत्रणा तैनात केली होती. दुपारी १२:५२ वाजेपर्यंत अग्निशमन दलाने आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवले. खबरदारीचा उपाय म्हणून परिसरातील वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. या दुर्घटनेत दोन महिलांना फटका बसला. त्यातील भावना सात्रा (६३) यांना रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. तर अनेरी (३४) यांची प्रकृती सध्या स्थिर असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# डॉलरऐवजी कागदी बंडल देऊन फसवणूक

## तीन जणांना अटक

**| मुंबई | प्रतिनिधी |**

डॉलरऐवजी कागदी बंडल देऊन एका चालकाकडील दोन लाख रुपये घेऊन पळून गेलेल्या तीन जणांना सांताक्रुज पोलिसांनी अटक केली आहे. जमीदर आयुनल शेख, इनामुल नुहू शेख आणि साहिल मंगलू शेख अशी तीन आरोपींची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार विरार येथे राहत असून चालक म्हणून काम करतो. २२ जानेवारी रोजी तो ठाण्यातील घोडबंदर रोड येथील फाऊंटन हॉटेलजवळ होता. त्यावेळी तिथे इनामुल नावाचा आरोपीने त्याच्याकडे ३२ हजार युएस डॉलर असल्याचे सांगितले. तसेच ते डॉलर भारतीय करन्सीमध्ये एक्सचेंज करायचे असून त्याच्याकडे पासपोर्ट नसल्याचे सांगितले. तसेच डॉलर भारतीय करन्सीमध्ये एक्सचेंज करण्यासाठी तुम्ही मला मदत करा. मी तुम्हाला दोन टक्के कमिशन देतो, असे आमिष दाखवले.

इनामुलवर विश्वास ठेवून चालकाने त्याला मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार २५ जानेवारीला चालक विलेपार्ले रेल्वे स्थानकावर इनामुलसोबत आणखी दोन जण होते. यावेळी इनामुलने चालकाला एक युएस डॉलर दिले. चालक तो डॉलर घेऊन भारतीय करन्सीमध्ये एक्सचेंज करण्यासाठी कार्यालयात गेला. त्यावेळी कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी डॉलर खरा असल्याचे सांगितले. त्यानंतर इनामुलने चालकाला दोन टक्के कमिशन देण्याऐवजी त्याच्याकडील ३२ हजार युएस डॉलर स्वस्त:त देतो असे सांगून चालकाकडून दोन लाख रुपये घेतले. ३२ हजार युएस डॉलर स्वस्त:त मिळाल्यामुळे चालक खूष झाला, मात्र थोड्या अंतरावर गेल्यानंतर चालकाने पिशवीतील डॉलर बघितले असता इनामुलने चालकाला डॉलरऐवजी कागदी बंडल दिल्याचे समझले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच चालकाने सांताक्रुज पोळी ठाण्यात चारही आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू करत जमीदर शेख, इनामुल शेख आणि साहिल शेख या तिघांना अटक केली.

## १५ जादा प्रवाशांना बसण्याची सोय | मार्चपासून सेवेत होणार दाखल

# एसटीच्या ताफ्यात ‘राजमाता जिजाऊ’ बस

**| मुंबई | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. राज्याच्या वैभवशाली इतिहासाचा वारसा जपत एसटीच्या ताफ्यात येणाऱ्या नव्या ५५ आसनी अत्याधुनिक बसेसचे नाव ‘राजमाता जिजाऊ’ ठेवण्यात आल्याची घोषणा राज्याचे परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी रविवारी केली.

शिवनेरी, शिवशाही, शिवाई आणि हिरकणी यांसारख्या नावांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ओळख निर्माण करणाऱ्या एसटीने आता




स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ साहेबांच्या नावाने नवी सेवा सुरू केली आहे. भगव्या आणि शुभ्र पांढऱ्या मोहक रंगसंगतीत सजलेल्या या बसेस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्याच्या रस्त्यांवर धावणार आहेत. यामुळे प्रवशांची मोठी सोय होणार आहे.

गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी तीन बाय दोन आसन रचनेच्या तब्बल ५५ आसनी अत्याधुनिक बस खरेदी करण्यात आल्या आहेत. या नव्या बसना ‘राजमाता जिजाऊ’ यांचे नाव देण्यात आल्याची माहिती परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. नव्या ५५ आसनी अत्याधुनिक बस मार्चपासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असून, भगव्या आणि पांढऱ्या रंगसंगतीत सजलेल्या या बस महाराष्ट्राच्या परंपरेचे आणि अभिमानाचे जणू चालते-बोलते प्रतीक ठरणार असल्याचे सांगण्यात आले.

मंत्री सरनाईक म्हणाले की, ‘छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत आहेत. त्यांच्या स्वराज्य संकल्पनेमागे उभी राहिलेली प्रेरणाशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ साहेब, त्या अर्थाने त्या हिंदवी स्वराज्याच्या जननी ठरतात, म्हणून त्यांच्या स्मरणार्थ एसटीच्या नवीन बसचे ‘राजमाता जिजाऊ’ असे नामकरण करण्यात आले.

### अतिगर्दीच्या मार्गांवर सुरु करणार

**एसटीच्या सध्याच्या बसची आसन क्षमता साधारण ४० प्रवासी इतकी असताना, नव्या बसमध्ये ५५ प्रवासी आरामात बसू शकतील. म्हणजेच गर्दीच्या मार्गांवर उभे राहणाऱ्या तब्बल १५ प्रवाशांना आता बसण्याची सोय उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ही सेवा विशेषतः दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गांवर सुरू करण्याचा एसटीचा मानस असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.**

> **“राजमाता जिजाऊ हे नाव केवळ नामकरण नाही, तर स्वराज्याच्या संस्कारांचा, मातृशक्तीच्या प्रेरणेचा आणि प्रवाशांच्या सोयीसाठीच्या बांधिलकीचे एक सन्मानचिन्ह आहे. लवकरच इतिहासाच्या साक्षीने सजलेल्या या बस आधुनिक सुविधांसह महाराष्ट्राच्या रस्त्यांवर धावतील.**
> **– प्रताप सरनाईक, परिवहनमंत्री.”**

# निवडक

## विद्यार्थ्यांची मोफत वैद्यकीय तपासणी



**खांब :** दीपक फाउंडेशन रोहा यांच्या वतीने नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथील विद्यार्थी वर्गाची मोफत वैद्यकीय तपासणी करण्यात आली. दीपक फाउंडेशन रोहा व दीपक नायट्रेट कंपनी धाटाव यांच्या वतीने तालुक्यातील ग्रामीण भागातील विशेषतः गरजू रूग्णांसाठी फिरत्या दवाखान्याच्या माध्यमातून मोफत वैद्यकीय तपासणी व औषधोपचाराचा कार्यक्रम गेल्या काही वर्षांपासून हाती घेतला आहे. त्याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून दीपक फाउंडेशन रोहा व दीपक नायट्रेट कंपनी धाटाव यांच्या वतीने श्रमिक विद्यालय चिल्हे येथील विद्यार्थी वर्गांची मोफत वैद्यकीय तपासणी करून मार्गदर्शन करण्यात आले. तसेच शारीरिक दोष आढळून आलेल्या विद्यार्थ्यांना मोफत औषधोपचार देण्यात आले. मुख्याध्यापक दीपक जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी वरिष्ठ प्रकल्प समन्वयक अजय आवाडे, डॉ. प्रियंका धनावडे, उत्कर्षा सरळेकर, अश्विनी म्हसकर, अंकिता ठाकूर, मारूती निगडे आदी दीपक फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

## गुटखा माफियांवर होणार कारवाई

**रत्नागिरी :** गुटखा तसेच प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या बेकायदेशीर विक्री, साठेबाजी आणि तस्करीला आळा घालण्यासाठी राज्य सरकारने निर्णायक पाऊल उचलले आहे. गुटखा तस्करी करणाऱ्या टोळ्यांच्या मुख्य सूत्रधारांवर आता थेट मकोका अंतर्गत कारवाई केली जाणार आहे. राज्यात गुटखाबंदी लागू असली, तरी प्रत्यक्षात पानटपऱ्या, किराणा दुकाने, तसेच गुप्त साठवणूक केंद्रांमधून आजही गुटखा, सुगंधित सुपारी आणि इतर प्रतिबंधित पदार्थांची सर्रास विक्री सुरू असल्याचे दिसून येत आहे. या बेकायदेशीर व्यवसायामागे संघटित टोळ्या सक्रिय असून, वाहतूक, साठवणूक आणि विक्रीची स्वतंत्र साखळी उभी करण्यात आली आहे. त्यामुळे सामान्य कारवाईचा या टोळ्यांवर कोणताही परिणाम होत नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने गुटखाबंदीकरिता स्वतंत्र आणि अधिक कडक कायदा लागू करण्याची तयारी सुरू केली आहे. मकोकामुळे आरोपीला सहजासहजी जामीन मिळणार नाही. दोषी सिद्ध झाल्यास आरोपींची अवैध मार्गाने कमावलेली मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार पोलिसांना देण्यात आले आहेत. दोषींना ५ वर्षांपासून ते जन्मठेपेपर्यंतची शिक्षा आणि ५ लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, शाळा आणि महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरात विक्री करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस विभाग करडी नजर ठेवणार आहे.

## नियम मोडल्यास लायसन्स होणार रद्द



**रत्नागिरी :** रस्ते अपघातामध्ये मृत्यू होण्याचे प्रमाण मोठे आहे. अनेक वाहनचालक नियमांचे पालन करीत नसल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर रस्ते अपघात रोखण्यासाठी केंद्र सरकारने मोटार वाहन कायद्यात मोठा बदल केला आहे. आता एका वर्षात पाचवेळा वाहतूक नियम मोडल्यास संबंधित वाहनाचे रजिस्ट्रेशन आणि चालकाचा परवाना कायमस्वरूपी रद्द केला जाणार आहे. लायसन्स रद्द कारवाईत सिग्नल तोडणे, हेल्मेट न घालणे, सीटबेल्ट न लावणे यांसारख्या नियमभंगाचाही समावेश करण्यात आला आहे. एका वर्षात एकाच वाहनावर पाचवेळा कारवाई झाल्यास वाहनाची नोंदणी काही काळासाठी रद्द होईल. त्यानंतर त्या वाहनाला फिटनेस प्रमाणपत्र, बँक कर्ज, परमिट, एनओसी मिळणार नाही; तसेच वाहनाचे नूतनीकरण किंवा हस्तांतरणही करता देखील अडचण येणार आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे बेशिस्त वाहन चालकांना चाप बसेल आणि रस्ते अपघातांचे प्रमाण कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## केसर कंपनीला भीषण आग

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील लोटे औद्योगिक वसाहतीमध्ये रविवारी (दि.८) सायंकाळी आगीची एक मोठी घटना घडली. येथील केसर कंपनीच्या मोकळ्या आवारात साडेसात वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. वाऱ्यामुळे आणि परिसरातील साहित्यामुळे आगीने काही वेळातच उग्र रूप धारण केले होते. आगीचे लोळ लांबून दिसत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. आगीची माहिती मिळताच लोटे औद्योगिक वसाहतीच्या अग्निशामक दलाने कोणताही विलंब न लावता घटनास्थळी धाव घेतली. अग्निशामक दलाच्या जवानांनी तातडीने पाण्याचा मारा सुरू केला आणि अथक परिश्रमानंतर आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवले. वेळीच उपाययोजना केल्या गेल्यामुळे आग कंपनीच्या मुख्य इमारतीपर्यंत पोहोचली नाही, ज्यामुळे मोठी आर्थिक हानी टळली. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. लोटे औद्योगिक वसाहतीत वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांमुळे येथील सुरक्षाव्यवस्थेबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. कंपन्यांनी आपल्या मोकळ्या जागेत ज्वलनशील कचरा किंवा साहित्य ठेवू नये, अशा सूचना प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येतात, मात्र तरीही अशा घटना घडत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

## पाम बीच मार्गावर अपघात

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील पाम बीच मार्गावर विशेषतः रात्रीच्या वेळी अनेक ठिकाणी भरधाव वाहनचालकांकडून स्टंटबाजी, अचानक लेन बदल, रेसिंग यासारखे प्रकार सर्रास घडत आहे. यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत आहे. अशातच नेरूळ ते सानपाडा मोराज सिग्नल दरम्यान सोमवारी (दि.९) दुपारी एक भीषण अपघात घडला. एका ऑटो रिक्षाला वाचवण्याच्या प्रयत्नात एका चालकाचं कारवरील नियंत्रण सुटलं आणि कार रस्त्यालगत असलेल्या डिव्हायडरला जोरात धडकली. कार पलटी झाल्यानंतर कारमध्ये असलेला चालक आणि ऑटो चालक हे दोघेही गंभीर जखमी झाले. जखमींना वाशी येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. डॉक्टरांच्या माहितीनुसार, दोघांचीही प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून या मार्गावर कडक वेगमर्यादाची अंमलबजावणी, स्पीड कॅमेरे, सीसीटीव्ही आणि रात्रीच्या वेळी पोलीस गस्त वाढवण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## निवडक



बारावीची परीक्षा सुरू होत असून विद्यार्थी आणि पालक परीक्षा क्रमांक व परीक्षा केंद्र कोणते आहे, याची माहिती पाहण्यात गुंतले आहेत. शाळा, नोटीस बोर्ड आणि ऑनलाईन यादीकडे विद्यार्थ्यांची गर्दी दिसत आहे. आत्मविश्वास, तयारी आणि थोडीशी उत्सुकता घेऊन विद्यार्थी परीक्षेसाठी सज्ज झाले आहेत. (छायाचित्र : राजेश डांगळे)

### खांब येथे धार्मिक कार्यक्रम

**खांब** : रोहा तालुक्यातील धानकान्हे गावचे सुपुत्र तथा सेवानिवृत्त वनाधिकारी शंकर धनावडे भाऊसाहेब यांच्या खांब येथील निवासस्थानी विविध प्रकारचे धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने संपन्न करण्यात आले. पूर्वजांच्या आत्मशांतीसाठी आजोबा वेटू गोसावी, कै.चिं.विश्वास धनावडे, आई व वडील गंगाबाई गौरू गोसावी, सुरेश पालवणकर व गोमाता यांच्या स्मृतींप्रित्यर्थ विविध प्रकारचे धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले. यावेळी हळदीकुंकू समारंभ, धानकान्हे ग्रामस्थ व खांब पंचक्रोशीतील सांप्रदायिक हरिभक्तांचे सामुदायिक हरिपाठ, सुधीर लोखंडे, चिल्हे महारा यांची प्रवचनरूपी व राम सावंत मुठवली खु.यांची हरिकिर्तनरुपी सेवा आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले. या सर्व कार्यक्रमांसाठी परिसरातील मोठ्या संख्येने भाविक भक्तांनी उपस्थिती नोंदवून विविध कार्यक्रमांचा आस्वाद घेतला.तर कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी समस्त धनावडे व गोसावी परिवार, धानकान्हे ग्रामस्थ, महिला मंडळ व गावदेवी क्रीडा मंडळ धानकान्हे तसेच खांब पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोलाचे सहकार्य केले. परिसरात भक्तीमय वातावरणाने आनंद पसरला होता.

### पतीच्या मित्राकडून विनयभंग

**खालापूर** : खोपोली शहरात पतीच्या ओळखीच्या मित्राकडूनच विवाहितेचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पीडितेने दिलेल्या तक्रारीनुसार, खोपोली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खालची खोपोली परिसरात ही घटना घडली. शनिवारी रात्री सुमारे २ वाजण्याच्या सुमारास पीडिता घरात एकटी असताना तिच्या पतीचा ओळखीचा मित्र जबरदस्तीने घरात घुसला आणि त्याने तिचा विनयभंग केला. या घटनेनंतर पीडितेने खोपोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीच्या आधारे संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### बौद्ध समाज संस्थांना पायाभूत सुविधांसाठी मिळणार अनुदान

**रायगड** : महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण अनुदान योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पात्र संस्थांना त्यांच्या इमारतीमध्ये पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी १० लाख रुपयांपर्यंतचे अनुदान उपलब्ध करून दिले जाणार असून इच्छूक पात्र संस्थांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी व सदस्य सचिव, उच्चस्तरीय निवड समिती रायगड-अलिबाग उमेश सुर्यवंशी यांनी केले आहे. योजनेसाठी पात्रतेचे निकषः संस्था राज्यातील धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. संस्थेच्या विश्वस्त किंवा सदस्यांमध्ये ५१ टक्क्यांपेक्षा जास्त सदस्य हे बौद्ध समाजातील असणे अनिवार्य आहे. संबंधित संस्था सांस्कृतिक, शैक्षणिक किंवा सामाजिक क्षेत्रात कार्यरत असावी. एका संस्थेला या योजनेंतर्गत जास्तीत जास्त ५ वेळा अनुदान घेता यणार आहे.

### वाहतूक पोलिसांचा दणका

**रायगड** : वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २२१ चालकांविरोधात वाहतूक पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत दोन दिवसात दोन लाख छत्तीस हजार रूपयांचा दंड वसूल करून बेशिस्त चालकांना दणका दिला. वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याची सवय चालकांना लागावी यासाठी जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने वेळोवेळी वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. रस्ता सुरक्षा अभियानासह सुरक्षित प्रवास करण्यावर भर देण्याचा प्रयत्न वाहतूक पोलीस करत असतात. हेल्मेट नसणे, वाहन वेगात चालविणे, टीबल सीट जाणे, वाहन चालविण्याचा परवाना नसणे अशा विविध वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांमार्फत वेळोवेळी सूचना केली जाते. तरीदेखील बेशिस्त चालक नियमांचे उल्लंघन करून वाहन चालवित असतात. पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली दर दिवशी पोलिसांमार्फत कारवाई केली जाते. शनिवार व रविवार या दोन दिवसाच्या कालावधीत जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने करण्यात आलेल्या कारवाईत दोन लाख छत्तीस हजार रूपयांचा दंड वसूल करण्यात आला. त्यामुळे रविवारी झालेल्या कारवाईत दोन लाख सहा हजार चारशे रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

# एसटी कर्मचारी आंदोलनाच्या पवित्र्यात

| रायगड | प्रतिनिधी |

महायुती सरकारच्या काळात राज्यातील एसटी कामगारांवर अन्यायाचे सत्र सुरू असल्याची एसटी कर्मचाऱ्यांची भावना झाली आहे. कामगारांना सन २०२० ते २०२४ या कालावधीतील वेतनवाढ फरकाच्या हप्त्याची रक्कम देण्यास पुन्हा टाळाटाळ करण्यात येत असल्यामुळे एसटी महामंडळ आणि महायुती सरकारविरोधात प्रचंड असंतोषाचे वातावरण आहे. या महिन्यात फरकाची रक्कम न मिळाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.



येत्या फेब्रुवारीच्या वेतनात फरक हप्त्याची रक्कम अदा न केल्यास कामगारांच्या संतापाचा उद्रेक होईल, अशी आक्रमक भूमिका महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेने घेतली असल्याचे औद्योगिक संबंध व प्रसिद्धी सचिव सदाशिव शिवणकर यांनी सांगितले. एसटी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी येत्या १२ फेब्रुवारी रोजी आंदोलन छेडणार आल्याचीही माहिती त्यांनी दिली. जानेवारी महिन्याचे वेतन अदा करण्यासाठी वेतनाची रक्कम विभागांना वर्ग करण्यात आली. मात्र ती रक्कम फक्त नियमित वेतनासाठी असल्याचे नमूद करून त्यात सन २०२०-२४ मधील वेतनवाढ फरकाच्या ४८ हप्त्यांपैकीची रक्कम समाविष्ट नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष खदखदत आहे.

वेतनवाढ फरकाची रक्कम अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. ती रक्कम मिळण्यासाठी कृती समितीच्या माध्यमातून संघर्ष करण्यात आला. त्यानंतर सरकारने फरकाचा हप्ता देण्याबाबत आश्वासन दिले. प्रत्यक्षात मात्र टाळाटाळ सुरू आहे. त्यामुळे प्रशासन आणि सरकारच्या निर्णयाविरोधात एसटी कर्मचारी तीव्र संताप व्यक्त करीत आहेत.

अहोरात्र काबाडकष्ट करणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांना त्यांच्या कष्टाच्या प्रमाणात मोल दिले जात नाही. हा कामगारांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. विविध महामार्ग बांधणीचे प्रकल्प असोत किंवा लाडकी बहीण योजना असो या बाबींसाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी राज्यकर्त्यांची भूमिका असते. त्यात एसटी कर्मचारी समाविष्ट नसावेत ही शोकांतिका असल्याचे एसटी कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

एसटी कर्मचाऱ्यांना त्यांच्या घामाचे दाम नियमितपणे अदा होणे आवश्यक आहे. फेब्रुवारीच्या वेतनामध्ये फरकाच्या हप्त्याची रक्कम अदा न झाल्यास कामगारांच्या भावनांचा विस्फोट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संभाव्य परिणामांची शक्यता लक्षात घेत फेब्रुवारीच्या वेतनामध्ये फरक हप्त्याचा समावेश करून वेतन अदा करण्याबाबत तातडीने सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे.

## स्वराजने कासा ते खंदेरी अंतर केले ५ तासात पार



| उरण | प्रतिनिधी |

उरण, बाजारपूर येथे राहणाऱ्या अवघ्या १२ वर्षीय स्वराज सोनाली संतोष पाटीलने कासा खडक ते खंदेरी किल्ला हे तब्बल १८ कि.मी.चे सागरी अंतर ५ तास ६ मिनिटांत पोहून पार करत हा धाडसी पराक्रम केला. तो उरणच्या सेंट मेरीज कॉन्व्हेंट स्कूलमध्ये सातवी इयत्तेत शिक्षण घेत आहे.

याआधीही स्वराजने उरणमधील मोरा जेट्टी ते मुंबई गेटवे ऑफ इंडिया हे १२ कि.मी. चे सागरी अंतर ४ तास २५ मिनिटांत पोहून पूर्ण केले होते. उरण नगरपरिषदेच्या जलतरण तलावात तो नियमित आणि कठोर सराव करत असतो.

शनिवारी रात्री ११ वाजून ५० मिनिटांनी कासा खडक येथून स्वराजने आपल्या सागरी मोहिमेला सुरुवात केली. काळोख, समुद्रातील प्रचंड लाटा, सोसाट्याचा वारा तसेच मोठमोठी जहाजे अशा अनेक अडथळ्यांवर मात करत त्याने अवघ्या ५ तास ६ मिनिटांत खंदेरी किल्ला गाठून इतिहास घडवला आहे. स्वराज सोनाली संतोष पाटील हा कमी वयात कमी वेळेत पोहून विक्रम करणारा पहिला जलतरणपट्टू ठरला आहे.

## मध्य रेल्वेकडून होळी स्पेशल रेल्वे गाड्या

| पनवेल | प्रतिनिधी |

होळी सणाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने यंदा मोठा निर्णय घेतला असून, मुंबई, नागपूर, चिपळूण, रत्नागिरीसह देशातील विविध ठिकाणांसाठी तब्बल २०९ होळी विशेष रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहेत. कुटुंबीय, नातेवाईक आणि प्रियजनांसोबत रंगांची उधळण करत होळी साजरी करता यावी, यासाठी हा विशेष रेल्वे बोनान्झा असल्याचे मध्य रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



भारतीय रेल्वेने यंदाच्या होळी उत्सवासाठी देशभरात एकूण १४१० विशेष रेल्वेगाड्या चालवण्याची योजना आखली आहे. त्यामध्ये मध्य रेल्वेचा मोठा वाटा असून, मुंबई-नागपूर-मुंबई, मुंबई-रत्नागिरी-मुंबई, मुंबई-चिपळूण-मुंबई तसेच अन्य महत्त्वाच्या मार्गांवर या विशेष गाड्या धावणार आहेत. दरवर्षी होळीच्या काळात मोठ्या प्रमाणावर प्रवासी आपल्या मूळ गावी जातात. त्यामुळे नियमित गाड्यांवरील ताण कमी करण्यासाठी आणि प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

या विशेष गाड्यांमध्ये वातानुकुलित (एसी) विशेष गाड्या, वातानुकुलित सह शयनयान कोच असलेल्या गाड्या, तसेच सामान्य द्वितीय श्रेणीचे कोच असलेल्या गाड्यांचा समावेश आहे.

## परीक्षेची भीती दूर करण्यासाठी समुपदेशकांची साथ

### दहावी-बारावी विद्यार्थ्यांसाठी १६ तज्ज्ञांची नियुक्ती; पालक-शिक्षकांनाही मार्गदर्शन

| रायगड | प्रतिनिधी |

राज्य शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या लेखी परीक्षेसाठी आवश्यक ती तयारी राज्य शिक्षण मंडळाच्या मुंबई विभागीय मंडळाकडून पूर्ण करण्यात आली आहे. या विभागातून दहावी आणि बरावीच्या परीक्षांना सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या मानसिक तणावाखाली अथवा परीक्षांच्या भीतीसंदर्भात येणाऱ्या अडचणींची सोडवणूक करण्यासाठी एकूण १६ समूपदेशक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. यासाठी विभागीय मंडळाकडून या समुदेशकांची यादी, त्यांचे दुरध्वनीक्रमांकही संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत.



मुंबई विभागात नियुक्त करण्यात आलेल्या सर्व १६ पूर्णवेळ समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते सकाळी ८ ते रात्री ८ दरम्यान विद्यार्थी, पालक, शिक्षकांना मार्गदर्शन करीत आहेत. यात विद्यार्थ्यांना परीक्षेच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांसमोर पडलेले प्रश्न, त्यांना निर्माण झालेली चिंता, आदींसोबत विद्यार्थ्यांना परीक्षेची भीती, अभ्यास नियोजन, वेळ व्यवस्थापन, गुणांची चिंता, अपयशाची भीती आणि मानसिक ताण भेडसावतो. समुपदेशक आत्मविश्वास वाढवून सकारात्मक अभ्यास पद्धती शिकवतील आणि मार्गदर्शन करतील

पालकांना मुलांच्या अपेक्षा, अभ्यासाचा ताण, करिअर निवडीबाबत संभ्रम आणि संवादातील अडचणी आदी भेडसावणाऱ्या अडचणींवर सर्व समुपदेशक पालकांना मुलांना मानसिक आधार, अभ्यासासाठी योग्य वातावरण आणि सकारात्मक प्रोत्साहन देण्याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. मुंबई विभागात नेमण्यात आलेल्या या समुदेशकांसोबत विद्यार्थी, पालकांनी तसेच शिक्षकांनीही फोनद्वारे संवाद साधावा, असे आवाहन विभागीय अध्यक्ष राजेंद्र अहिरे यांनी केले आहे.

**असे आहेत संपर्क क्रमांक**

८१०८१५०४३७, ९८६९५५६७०, ८१०४९३९२६०, ९८६९४८४५१६, ८८५००५४१८३,९७०२००६००३, ९७०२००८०५३, ९८२०१६६९९४, ९८२०१६६९९४, ९८२०७८२०५७, ९८२०७८२०९७,९७०२८५२०००, ९७०२८५२०००, ९६९९५३१४५२, ९८०६५३१४५२, ०२८२७०९५३, ९८८०३३०४६८, ९८९०३३०४०८, ९०२०९२९७७९, ९६६९३७६२५०, ९९३७३०२०१०, ९९८७५८२६१०,९८२१८७११५४६, ९८२१८७९६४८, ९८३०११०१५९, ९३२२१०५६१३, ९६९९१६७८६०.

## सायक्लोथॉन मार्फत रायगडात जनजागृती

### सागरी सुरक्षा बळकटीसाठी सीआयएसएफचा पुढाकार; बुधवारी होणार रायगड जिल्ह्यात दाखल

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल अर्थात सीआयएसएफच्या मार्फत सायक्लोथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. सागरी सुरक्षा बळकट करण्यासाठी या दलाने पुढाकार घेतला असून बुधवारी सकाळी मांडवा येथे हे दल पोहचणार आहे. साडेसहा हजार किलोमीटरचा प्रवास करणाऱ्या या दलामध्ये पुरुषांसह महिलांचाही समावेश आहे.



सागरी किनारे सुरक्षीत व बळकट करणे. स्वातंत्र्य सैनिक व सुरक्षा दलांच्या बलिदानाचा आदर करणे. भारताच्या सागरी वारसाचा गौरव करणे. युवकांमध्ये फिटनेस आणि शिस्तीची भावना निर्माण करणे हा उद्देश समोर ठेवून सायक्लोथॉनचे आयोजन केले आहे. यामध्ये ५० टक्के महिला सहभागी झाले आहेत. नऊ किनारी राज्ये व दोन केंद्र शासित प्रदेश असा एकूण साडेसहा हजार किलो मीटरचा प्रवास सायकलद्वारे केला जाणार आहे. या सायक्लॉथोनचा समारोप २२ फेब्रुवारीला होणार आहे. विकसीत भारत २०४७ या राष्ट्रीय दृष्टीकोनाला साकार करण्यासाठी सामुदायिक सक्षमीकरण, सतर्कता, व जबाबदार नागरिकत्वाला प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

पश्चिम तट सायकलिंग टीम वसई विरार येथून मुंबई येथील गेटवे ऑफ इंडिया मार्गे रायगड जिल्हयातील मांडवा बंदर येथे साडेअकरा वाजता पोहचणार आहे. या प्रवास क्रमात सीआयएसएफ थळ युनीट पोहचणार आहे.



## बदलांमुळे फ्लेमिंगोंची शहराकडे पाठ

| पनवेल | प्रतिनिधी |

नवी मुंबई आणि आसपासच्या पाणथळ भागात दरवर्षी जानेवारीत गर्दी करणारे फ्लेमिंगो यंदा मात्र अपेक्षेप्रमाणे दिसून आलेले नाहीत. हिवाळ्याचा अर्धा टप्पा उलटूनही मोठ्या फ्लेमिंगोंच्या गुलाबी थव्यांचे आगमन न झाल्याने पक्षीप्रेमी, निसर्ग अभ्यासक आणि छायाचित्रकारांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

साधारणपणे डिसेंबरच्या अखेरीस आणि जानेवारीच्या पहिल्या पंधरवड्यात खाडी आणि पाणथळ परिसर गुलाबी रंगात न्हाऊन निघतो. मात्र यंदा काही ठिकाणी मोजकेच फ्लेमिंगो दिसत असून, ठाणेखाडी, तुर्भे परिसर आणि नवी मुंबईतील काही पाणथळ भाग व तलावांमध्ये फ्लेमिंगोंची संख्या अत्यल्प असल्याचे निरीक्षण नोंदवले जात आहे. काही पर्यावरण अभ्यासकांनी याबाबत चिंता व्यक्त केली असून, खाडीतील पाण्याच्या गुणवत्तेत झालेला बदल आणि अन्नसाखळीवर परिणाम करणारे घटक यासाठी कारणीभूत असू शकतात, असे मत पर्यावरण अभ्यासक व्यक्त करत आहेत.

फ्लेमिंगो उशिरा येण्याची ही पहिली वेळ नाही. खाडीतील पाणीपातळी, क्षारता आणि शांतता या घटकांमध्ये सुधारणा झाली, तर फेब्रुवारीतही ते दाखल होऊ शकतात, असे मत पक्षी अभ्यासकांनी व्यक्त केले आहे. पक्षीप्रेमी मात्र फ्लेमिंगोंची संयमाने वाट पाहत आहेत.

## खानावळींसाठी घरगुती गॅस सिलिंडर

**पनवेल** : खारघर परिसरातील अनेक खानावळी, लहान हॉटेल्स व उपहारगृहांमध्ये व्यावसायिक गॅस सिलिंडरऐवजी घरगुती एलपीजी सिलिंडरचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. कमी दरात गॅस मिळावा, खर्च वाचावा या उद्देशाने काही व्यावसायिक नियम डावलून घरगुती सिलिंडर वापरत असल्याने हा प्रकार अत्यंत धोकादायक ठरत आहे.

घरगुती सिलिंडरचा वापर हा मुख्यतः घरगुती स्वयंपाकासाठी मर्यादित असून, त्याचा व्यावसायिक वापर कायद्याने बंदी आहे. खारघर परिसरात अनेक ठिकाणी खानावळ सुरू आहेत. खानावळींमध्ये दुपार आणि सायंकाळी मोठ्या प्रमाणावर स्वयंपाक केला जात असल्याने गॅसचा दाब, उष्णता आणि सिलिंडरवरील ताण अधिक वाढतो. परिणामी गॅसगळती, आग लागणे किंवा स्फोट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### वाहतूक कोंडी कायम

**अलिबाग** : अलिबाग वावे मार्गावरील सहाणगोठी ते सहाण बायपास येथे रस्त्याचे काम सुरू आहे. मात्र, संथगतीने सुरू असलेल्या कामाचा फटका येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना बसत आहे. त्यामुळे सहाणगोठी जवळ अनेकवेळा वाहतूक कोडींचा त्रास प्रवाशांना होत आहे.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजेत. शिक्षणाची अट नाही. ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार- १२००० महिना, संपर्क : ९८२३५८५३२१
- कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रेस्टॉरंट मॅनेजर,रिसेप्शनिस्ट,कॉन्टिनेंटल,मेन्टेनन्स,वेटर, हाऊसकिपींग, रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- अलिबाग शहर येथील हॉस्पिटलच्या कामासाठी सिस्टर व मावशी यांची आवश्यकता आहे. संपर्क : ९८२२४०९८४९/९८५०३४८५०६
- मेघा टॉकीजसमोर स्वामी समर्थ बंगला १५०० SF. Reputed Bank Back office साठी उत्तम.
- Vintage दगडी सागवानी बंगलो मांडवा-सारळ समुद्रापासून २ मिनीट स्वीमिंग पूल गार्डन वगैरे सोयीसह. Contact- 9373747354

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

**आंबा उत्पादकांना फळधारणेची चिंता | करपा रोगाने काढले डोके वर**

## यंदाही आंबा हंगाम कसोटीचाच

| रायगड | प्रतिनिधी |

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आंबा उत्पादन घेतले जाते, परंतु मागील काही दिवसांत ढगाळ वातावरण आणि त्यात धुके सातत्याने असल्याने बुरशीजन्य रोगात वाढ होत आहे. करपा रोगाचा प्रादुर्भाव आंबा मोहोरावर जाणवत आहे. काही ठिकाणी आंबा बागेत ७० ते ८० टक्के मोहोर आला असून, काही आंबा बागांमध्ये मोहोर येण्याची प्रक्रिया अजूनही सुरू आहे, परंतु करपा रोगाने डोकेवर काढल्याने मोहोर टिकवणे कसरतीचे ठरत आहे.



दरवर्षी निसर्गाचा वाढता लहरीपणा, तसेच लांबत असलेला पाऊस, ढगाळ वातावरण, दमटपणा, आर्द्रता त्यामुळे एकंदरीत वातावणात होणारा बदल याचा परिणाम आंबा पिकांवर होताना दिसत आहे. त्यामुळे बदललेल्या हवामानाचा अंदाज घेता यंदाही आंब्याचा हंगाम आंबा उत्पादकांसाठी कसोटीचाच असणार आहे. आंबा उत्पादक शेतकऱ्यांकडून फळधारणेची चिंता व्यक्त केली जात आहे, असे आंबा उत्पादक शेतकरी लक्ष्मण निमण यांनी सांगितले आहे. सुरुवातीला आलेल्या मोहोरातून काही अंशी फळधारणा होण्यास सुरुवात झाली आहे, परंतु मागील काही दिवसांत सातत्याने ढगाळ वातावरण आणि धुके यामुळे करपा रोगाचा प्रादुर्भाव जाणवत आहे. उशिरा आलेला मोहोर काळा पडून गळण्याची दाट शक्यता आहे. वेळीच उपायोजना न झाल्यास त्याचा विपरीत परिणाम आंबा उत्पादनावर होण्याची शक्यता ही वर्तविण्यात येत आहे.

आंब्याच्या मोहोरावरील बुरशीजन्य करपा रोगाला ढगाळ वातावरण पोषक असते.रोगामुळे तपकिरी, काळे डाग पडून मोहोर गळून जातो. लहान फळांवर काळे डाग पडून फळगळ होते. रोगामुळे लहान नुकतीच लागलेली छोटी फळे गळून पडतात. रोगाच्या नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डो मिश्रण किंवा १० लिटर पाण्यात १० ग्रॅम कार्बेन्डाझिम + मँकोझेब किंवा २५ ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराइडची फवारणी करावी. जिवाणूमुळे होणाऱ्या रोगाची लक्षणे म्हणजे कोवळ्या फळांवर पांढरे दुधाळ बारीक दवबिंदू दिसतात. अशा वेळी बुरशी नाशकासोबत स्ट्रेप्टोसायकलिंग २ ग्राम प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.

### परीक्षांची लगबग सुरू

रायगड : जिल्ह्यामध्ये बारावीची परीक्षा मंगळवारी १० फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. तर १० वीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. या दोन्ही परीक्षा १८ मार्च रोजी संपणार आहेत. या परीक्षेदरम्यान पाचवीपासून ते नववी पर्यंतच्या परीक्षा सरू करण्यात आल्या आहेत. या परीक्षा मार्च महिन्यात संपणार आहेत. त्यामुळे त्या परीक्षांची देखील लगबग जिल्ह्यामध्ये सुरू आहे. या परीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थी मेहनत घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे जिल्ह्यात परीक्षांची लगबग सुरू झाली आहे. विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी सज्ज झाले आहेत.

# खांदा येथे प्रॉपर्टी प्रदर्शनाचे उद्घाटन



। चिरनेर । प्रतिनिधी ।

आमदार विक्रांत पाटील आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या हस्ते नवव्या प्रॉपर्टी प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी (दि.६) खांदा रेल्वे स्थानकाशेजारी झाले.

यावेळी महेंद्र घरत यांनी, येत्या काळात रायगड जिल्हा विकासाचे केंद्रबिंदू असेल. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि अटल सेतूमुळे रायगड जिल्ह्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. येथे रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणावर होईल. उलवे, पनवेल, खारघर, पुष्पकनगर येथील घरांच्या किमती येत्या काळात गगनाला भिडतील. येथे गरिबांना घर घेणे अशक्य होईल. त्यामुळे सिडकोने घरे बांधताना आणि विकतानाही गरिबांचा विचार करायला हवा. जमीन सिडकोचीच असते. त्यामुळे अल्पदरात सर्वसामान्यांना सिडकोने घरे बांधून देणे सहजशक्य आहे. क्रेडाई रायगडच्या माध्यमातून होत असलेले प्रॉपर्टी प्रदर्शन लक्षणीय आहे. त्यात सर्व प्रकारच्या ग्राहकांचा विचार आहे. विशेषतः थर्ड जनरेशनचा अधिक विचार बांधकाम व्यावसायिकांनी केला आहे. त्यामुळे ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळेल. बांधकाम व्यावसायिकांनी भविष्यकाळातील घरांची मागणी लक्षात घेऊन प्रकल्प उभारले आहेत. त्याबद्दल सर्व बांधकाम व्यावसायिकांचे अभिनंदन देखील महेंद्र घरत यांनी केले.

आमदार विक्रांत पाटील यांनी, पनवेल शहर जोमाने विकसित होत आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे खूप संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्याचा फायदा बांधकाम व्यावसायिकांना निश्चितच होईल. विकासाचा वेग वाढल्यामुळे घरांची मागणी वाढेल. येत्या काळात सर्वसामान्य नागरिकांना घर घेणे अशक्य होईल. प्रॉपर्टी प्रदर्शनामुळे घराची निवड करताना अनेक पर्याय उपलब्ध आहेत. ग्राहकांना निश्चितच त्याचा फायदा होईल, असे त्यांनी सांगितले.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## निविदा सुचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग, अलिबाग कार्यालयाअंतर्गत असणारे लघुदाब व उच्चदाब वाहिन्या आणि वितरण रोहित्रे यांच्या ब्रेकडाऊन देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी आणि नवीन सेवा जोडण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास (NSC) योजनेकरिता वर्ष २०२६-२७च्या करारासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नामिकाप्रविष्ट (Empanelment) करणेसाठी, अलिबाग विभागाअंतर्गत अलिबाग-१ उपविभागातील ग्राहकांचे रिडिंग घेणेसाठी, वीज देयके छपाई व वाटप करण्यासाठी (अंदाज पत्रकीय रक्कम :- १९८.४१ लाख) आणि अलिबाग विभागाअंतर्गत महाराष्ट्रातील विविध स्टोअरमधून प्राप्त झालेले ९ MT प्रति पॅकेज पर्यंत वजनाचे साहित्य/उपकरणे यांच्या वाहतुकीसह साहित्य/हाताळणीसाठीच्या कराराकरिता (अंदाज पत्रकीय रक्कम :- ०५.०० लाख) ई-निविदा क्रमांक टी-०१, टी-०२, टी-०३, टी-०४/२०२६-२७, टि-१७/०२-२०२६, टि-१८/०२-२०२६ एकूण ६ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि.१०.०२.२०२६ ते २४.०२.२०२६(रात्रौ ११.५० वा.) पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. २४.०२.२०२६ ला रात्रौ ११.५५ वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत/ शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

PRO NO-021 कार्यकारी अभियंता, अलिबाग विभाग

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, माझ्या अशिलांनी मौजे-आंबेघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील विद्यमान मालक श्री. प्रकाश नागू म्हात्रे व श्री. भारत त्र्यंबक नागे, रा.मु. पेझारी, आंबेपूर नवीन वसाहत ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या खुद्द मालकीची खालील वर्णनाची बिनशेती मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे-आंबेघर, ता.अलिबाग येथील भूमापन क्रमांक १३/१ क्षेत्र ५२.७०.०० आर.चौ.मी., आकार रु. ५२७.०० पैसे या बिनशेती मिळकत.

तरी वर वर्णन केलेली मालमत्ता विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वाहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहित विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या आशिलास दिली आहे. तरी वरील मालमत्तेसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हित संबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासाहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास माझे अशिल या संदर्भित मालमत्तेचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक: १०/०२/२०२६

सही /-
**ॲड. सचिन सदानंद पाटील**
मु. ७६२/ए/बी, आई बंगला,
'शिवसागर', वसाहत, कुरुळ
ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०९
मो. नं. ९८८१६३७९२४



# अलिबागकर बाबांची पुण्यतिथी साजरी

। खांब । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील श्री क्षेत्र तळवली तर्फे अष्टमी येथे गणपत गुडेकर उर्फ स्वा.सु.गुरूवर्य अलिबागकर बाबांचा पुण्यतिथी सोहळा मोठ्या भक्तीभावाने साजरा करण्यात आला. या पुण्यतिथी सोहळ्याप्रसंगी गुरूमूर्ती पूजन, कलश स्थापना, ध्वजारोहण, विणा पूजन व विणा पहारा भजन, दुपारी बळीराम शेळके यांची पुष्पवृष्टीपर कीर्तन सेवा, सायंकाळी नामदेव यादव यांची प्रवचन व सामुदायिक हरिपाठ, तर रात्री अनिल सानप यांची हरिकिर्तनरूपी सेवा, काल्याचे अभंग व समाप्ती इत्यादी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले. या संपुर्ण पुण्यतिथी सोहळ्याचे यशस्वीतेसाठी खांब पंचक्रोशीतील वारकरी बंधू आणि भगिनी तसेच ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच तरूण मंडळ यांनी मोलाचे सहकार्य केले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक दशरथ नामदेव कांबेरे व दिपक मारूती लोभी यांचेकडून आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे.आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३१/१० | ००-१५-०० | ०.१६ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- १० फेब्रुवारी २०२६

**ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक गोविंद दामा माळी आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे.आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३१/३/ब | ००-३४-९० | ४.२६ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- १० फेब्रुवारी २०२६

**ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक वासुदेव वाळकू गायकर व राजेंद्र वाळकू गायकर यांचेकडून आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे.आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३०/३ | ००-३१-१० | २.३१ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- १० फेब्रुवारी २०२६

**ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांने मौजे काळींजे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट नं. व उपविभाग क्र. ४९३ एकूण क्षेत्र ०-३५-४०, आकार ३.१३ लागवड-गवतपड, मौजे काळींजे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट नं. व उपविभाग क्र. ४९४, एकूण क्षेत्र ०-५९-७०, आकार २.१२, लागवड-गवतपड इतक्या क्षेत्राची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अभिषेक दिलीप दामले व श्री अभिषेक निळकंठ पाटील सर्व राहणार मौजे काळींजे, ता.श्रीवर्धन, जि.रायगड यांच्याकडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची ठरवली आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या आशिलांनी संबंधीत जमिन मालकांन सोबत केलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबेकब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी स्वरूपाचा दावा दाखल नाही.

वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा, पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक : १०/०२/२०२६

सही/-
**ॲड. अतुल अरविंद चौगुले**
B.L.S. LL.B
खरेदीदाराचे वकील

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड अलिबाग कार्यालय**
**काँग्रेस भवन ट्रस्ट इमारत, तळमजला, महर्षी कर्वे रोड, अलिबाग जि. रायगड पिन कोड ४०२२०१**
Email ID : ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र जिउनि/कात-०९/अपसेटप्रा. नोटीस/समता नागरी पतसंस्था/सन २०२६ दिनांक : /०१/२०२६
अर्ज क्रमांक : / २०२६

**महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७ (११) अन्वये जाहीर नोटिस**

वसुली अधिकारी,
समता नागरी सहकारी पतसंस्था, मर्या. कोपरगांव ता. अहमद नगर — अर्जदार

विरुद्ध

१. श्री. किशोर ओटरमन जैन, (कर्जदार),
पत्ता :- १७१६/०१, अंजुपार्क बाजारपेठ मु.पो. नागोठणे, ता. रोहा, रायगड
२. श्री.किरण अमृतलाल जैन — गैरअर्जदार
पत्ता:-आर्ची किराणा बाजार पेठ, जोगेश्वरी पतसंस्थे शेजारी मु. पो. नागोठणे ता. रोहा, जि. रायगड
३. श्री. दिनेश मिश्रीमल परमार,
पत्ता:-जैन एजन्सी बाजारपेठ मु. पो. नागोठणे ता. रोहा, जि. रायगड
४. असमल रमजान शेख,
मु.पो. नागोठणे ता. रोहा, जि. रायगड

अर्जदार पतसंस्थेकडून प्रतिवादी यांनी घेतलेले कर्ज थकीत झालेमुळे सदर संस्थेने प्रतिवादी यांचेविरूध्द प्राप्त केलेले महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अंतर्गत वसुलीचे प्रमाणपत्राची अंमलबजावणी अर्जदार संस्थेचे वसुली अधिकारी यांचे मार्फत करण्यात येत असून संबंधित वसुली अधिकारी यांनी खालील मालमता जप्त करुन सदर मालमत्तेची जाहिर लिलावाने विक्री करणेसाठी सदर मालमत्तेचे मुल्य रक्कम ही वाजवी किंमत/अपसेट प्राईस रक्कम म्हणुन मान्यता देण्याचा प्रस्ताव दाखल केला आहे.

| अ. क्र. | मालमता मालकाचे नाव | मालमत्ता स्थळ | मालमता वर्णन/ तपशिल | शासकीय दराने मुल्य | बाजारभाव दराने मुल्य | डीस्ट्रेस व्हॅल्यु |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. किशोर ओटरमन जैन, (कर्जदार), | (अ.ब.क) मौजे उसाळे, ता. सुधागड जि.रायगड | खालील प्रमाणे आहे | १,३२,०३,०००/- | ३,२१,१३,०००/- | ३,०५,०७,३५०/- |

| अ. क्र. | भूमापन क्र. | क्षेत्र एकक आर.ची. | अ. क्र. | भूमापन क्र. | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | अ. क्र. | भूमापन क्र. | क्षेत्र एकक आर चौ.मी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./१ | ५.५१ | २१ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./९ | १.७४ | ४१ | २४/ब/५/ब/भूखंड क्र./१७ | १.७० |
| २ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./२ | १.६३ | २२ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./१० | १.७२ | ४२ | २४/ब/५/ब/भूखंड क्र./१८ | १.६९ |
| ३ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./३ | १.९२ | २३ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./११ | १.५७ | ४३ | २४/ब/५/ब/भूखंड क्र./१९ | १.७९ |
| ४ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./४ | १.८६ | २४ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./१२ | १.४२ | ४४ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./२० | १.६९ |
| ५ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./५ | १.७८ | २५ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./१३ | १.७९ | ४५ | २४/ब/५/ब/ भुखंड क्र./२१ | १.७१ |
| ६ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./६ | १.८५ | २६ | २४/ब/५/ब/भूखंड क्र./१४ | २.१५ | ४६ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./२२ | १.६९ |
| ७ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./७ | २.२६ | २७ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./१५ | १.७१ | ४७ | २४/ब/५/ब/ भुखंड क्र./२३ | १.९७ |
| ८ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./८ | १.५४ | २८ | २४/ब/५/ब/ भुखंड क्र./१६ | १.६९ | ४८ | २४ /ब/५/ब/भुखंड क्र./२४ | २.३७ |
| ९ | २४/ब/५/ब/भूखंड क्र./२५ | १.७८ | २९ | २४/ब/५/ब/भूखंड क्र./३६ | १.४२ | ४९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./४७ | २.३९ |
| १० | २४/ब/५/ब/भुखंड क्र./२६ | १.७४ | ३० | २४/ब/५/ब/भूखंड क्र./३७ | ३.१२ | ५० | २४/ब/५/ब/भुखंड क्र./४८ | २.०० |
| ११ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./२७ | १.७३ | ३१ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./३८ | २.४६ | ५१ | २४/ब/५/ब/ भुखंड क्र./४९ | ३.६६ |
| १२ | २४/ब/५/ब/भूखंड क्र./२८ | १.९७ | ३२ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./३९ | २.३४ | ५२ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./५० | २.४४ |
| १३ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./२९ | २.०७ | ३३ | २४/ब/५/ब/भूखंड क्र./४० | १.६९ | ५३ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./५१ | ४.२९ |
| १४ | २४/ब/५/ब/भूखंड क्र./३० | १.८० | ३४ | २४/ब/५/ब/भूखंड क्र./४१ | १.६९ | ५४ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./५२ | ५.८५ |
| १५ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./३१ | १.६८ | ३५ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./४२ | १.७१ | ५५ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./५३ | १.९३ |
| १६ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./३२ | २.६९ | ३६ | २४/ब/५/ब/ भुखंड क्र./४३ | १.७० | ५६ | २४/ब/५/ब/भूखंड क्र./५४ | २.०४ |
| १७ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./३३ | २.४५ | ३७ | २४/ब/५/ब/भूखंड क्र./४४ | १.६९ | ५७ | २४/ब/५/ब/भूखंड क्र./५५ | ४.९६ |
| १८ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./३४ | २.१० | ३८ | २४/ब/५/ब/भूखंड क्र./४५ | १.६९ | ५८ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./अंतर्गत रस्ता | ८२.४८ |
| १९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./३५ | १.४९ | ३९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./४६ | १.६९ | ५९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र./खुली जागा | २४.७५ |
| २० | २४/ब/५/ब/भुखंड क्र./ सुविधाजन्य क्षेत्र | १२.०५ | ४० | २४/ब/५/ब/भुखंड क्र./बांधकाम रहीत क्षेत्र | २.२९ | | | |

मालमत्ताधारक आणि त्यातील हितसंबंधी यांनी सदर रकमेस वाजवी किंमत/अपसेट प्राईस रक्कम म्हणुन मान्यता का देण्यात येवू नये? याबाबत प्रतिवादी यांना म्हणणे मांडण्यासाठी दि. १३/०१/२०२६ व २२/०१/२०२६ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती, सदर सुनावणीस हजर राहण्याकरीता कर्जदार व जामिनदार यांना रजिस्टर पोस्टाने नोटीस बजावण्यात आलेली होती, मात्र ते हजर न राहील्याने नैसर्गीक न्यायतत्वानुसार त्यांना पुन्हा एकदा त्यांचे म्हणणे दाखल करणे करीता त्यांच्या निदर्शनास येण्याकरीता त्यांना पेपर नोटीसीद्वारे कर्जदार व जामिनदार यांना संधी देण्यात येत आहे. तरी त्यांनी आपले म्हणणे मांडण्यासाठी निम्नस्वाक्षरीकार यांचे समोर दिनांक १२/०२/२०२६ रोजी ११.०० वा. आवश्यक पुराव्यासह उपस्थित रहावे. अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून आपले गैरहजेरीत सुनावणी कामकाज पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**(तनवीर पाटील)**
**जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, रायगड-अलिबाग**

दिनांक : १० फेब्रुवारी २०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| मिलिंद शरदचंद्र भडसावळे<br>शमिका मिलिंद भडसावळे | ४७० | २१ | ५६१.०० | ५६ | १० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :- १०/०२/२०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली स्थावर सदनिका माझे अशिल श्री.संजय राजाराम मोहिते आणि वैशाली संजय मोहिते यांच्या मालकीची असून सदरची सदनिका विकण्याचे ठरविले आहे. त्या सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मौजे चेंढरे, ता.अलिबाग येथील सर्वे नं.३, हिस्सा नं. ३, क्षेत्र ०-२२-० हे. आर. आकार रु. ४४.०० ह्या बिनशेती मिळकतीवर बांधलेल्या सुमंगल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चेंढरे अलिबाग ह्या इमारतीमधील डी विंग मधील तळ मजल्यातील सदनिका क्र.४३, क्षेत्र ५१६ चौ.फूट (बिल्ट अप ४७.९५ चौ.मी.), चेंढरे ग्रामपंचायत मालमत्ता क्र. १११९/१ क्षेत्र ५१६ चौ. फुट हि मिळकत

वर नमूद सदनिकेच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट, ताबा, बयाणा पावती, रजिस्टर्ड अगर अनरजिस्टर्ड साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बोजा, बक्षीस, मृत्यूपत्र, भाडेपट्टा, जप्ती, लीज, लियन, अन्नवस्त्र-पोटगी, वारसाहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांच्या आत त्यासंबंधातील लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे त्यांचे नमूद पत्त्यावर कळवावी.

या नोटीसमध्ये नमूद केलेल्या मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात न कळविल्यास सदरची सदनिका निर्वेध आहे असे समजुन तसेच सदर सदनिकेशी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे, असे समजुन आमचे अशिल वरील वर्णनाच्या सदनिकेचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व सदरच्या व्यवहारानंतर कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक : ०६/०२/२०२६

**ॲड. रुपिका विजय पाटील**
बी.एल.एस.एल.एल.बी.
पत्ता : अकॉन्स क्लासिक, अलिबाग
कोर्टच्यासमोर, अलिबाग - रायगड
कॉल : ८२३७५३१४१४

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# नेपाळनेही इंग्लंडला फोडला घाम!

उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या, आत्मविश्वासाने भारलेल्या आणि लाखो चाहत्यांच्या पूर्वीपेक्षाही अधिक अपेक्षांचे ओझे घेऊन, नवोदित नेपाळ, मुंबईत दाखल झाला होता. त्याच नेपाळ संघाने भारताच्या क्रिकेट नर्सरीत, मुंबईत खेळताना रविवारी तमाम क्रिकेट रसिकांची मने जिंकली. क्रिकेटच्या जन्मदात्या इंग्लंडला, हिमालयाच्या कुशीत वाढलेल्या या कणखर क्रिकेटपटूंनी, दाती तृण धरायला लावले.




माजी विजेत्या इंग्लंडला त्यांनी जवळजवळ हरवले होते. विजय आणि पराजय यातील पण फरक फक्त चार धावांचा होता. एखादा चौकाराचा फटका नेपाळ संघाला यंदाच्या विश्वचषक स्पर्धेतील धक्कादायक विजय मिळवून देऊ शकला असता. वानखेडे स्टेडियमवर या समर प्रसंगात, अनुभवी इंग्लंड संघ निर्णायक क्षणी अधिक ढेपाळलेला वाटत होता. त्यांचे सर्व गोलंदाज अखेरच्या निर्णयक षटकांमध्ये, 'वाईड' चेंडू टाकत होते. शेवटच्या षटकात नेपाळला विजयासाठी दहा धावा हव्या होत्या त्यावेळी सॅम करन याने मात्र आपला अनुभव पूर्णपणे पणाला लावून गोलंदाजी केली आणि इंग्लंडच्या हातून निसटलेला विजय पुन्हा मिळविला.

**विनायक दळवी**

शनिवारी, नवोदित अमेरिका संघाने गतविजेत्या आणि यजमान भारताची झोप जवळजवळ उडवली होती. रविवारी त्याच वानखेडे स्टेडियमवर नेपाळने त्यापुढे जात, इंग्लंडची मोठी धावसंख्या गाठण्यात यश मिळवल होत. फरक फक्त एका चौकाराचा राहिला.

नेपाळ संघ आपल्या तिसऱ्या टी-२० विश्वचषकात आणि कदाचित पहिल्यांदाच खऱ्या अर्थाने मोठ्या अपेक्षांच्या दबावाखाली खेळत होता.

रोहित पौडेलच्या संघाने गेल्या बारा टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांपैकी दहा सामने जिंकले आहेत, आणि तेही सर्व परदेशात, ही केवळ एकच गोष्ट नाही, तर त्या विजयांची पद्धत आणि प्रतिस्पर्धी संघांची गुणवत्ता अधिक प्रभावी ठरली आहे. या संघाने निर्णायक विजय मिळवण्याची क्षमता आणि उच्च-रँक असलेल्या संघांविरुद्ध आत्मविश्वास मिळवला आहे, ज्या गोष्टीचा अभाव किंवा उणीव यापूर्वी त्यांच्याच जाणवायची.

शारजाहमध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध ऐतिहासिक मालिका जिंकल्यानंतर, नेपाळने ओमानमधील संयुक्त आशिया-ईएपी प्रादेशिक अंतिम फेरीत अपराजित राहून विजय मिळवला आणि त्यानंतर ते नेपाळ प्रीमियर लीगसाठी मायदेशी परतले.

मुख्य प्रशिक्षक स्टुअर्ट लॉ यांनी जवळपास एक वर्षापूर्वी पदभार स्वीकारल्यानंतर नेपाळच्या या संघाला हळूहळू स्थैर्य प्राप्त होत आहे. कुशल मल्ला आणि मोहम्मद आदिल आलम यांच्यासारख्या खेळाडूंना संघातून वगळण्यात धाडस नेपाळ करू शकतो, यावरून त्यांची ताकद वाढल्यात लक्षात येते.

ऑफ-स्पिनर शेर मल्लाने नेपाळ प्रीमियर लीगमधील विकेट्सच्या जोरावर संघात स्थान मिळवले आहे. याचाच अर्थ नेपाळमधील स्थानिक क्रिकेटचा दर्जा देखील उंचावत आहे हे स्पष्ट होत आहे. अनुभवी बिनोद भंडारीच्या देशांतर्गत क्रिकेटमधील चांगल्या फॉर्मनंतरही, लोकेश बमला राखीव यष्टीरक्षक म्हणून प्राधान्य दिले गेले आहे. याचाच अर्थ नेपाळ देखील भविष्यातील संघांचा, संघ बांधणीचा विचार करीत आहे. असे असले तरी, तरुण नंदन यादव एक चांगला वेगवान गोलंदाज असला तरी, सोमपाल कामी आणि करण केसी या अनुभवी वेगवान गोलंदाजांच्या जोडीचा स्पष्ट वारसदार अजूनही दिसत नाही. फलंदाजी फळी भविष्यासाठी सुसज्ज दिसत आहे. सलामीवीर कुशल भुर्तेल हा अवघ्या २९ वर्षांचा असून, तो पहिल्या सहा फलंदाजांमध्ये सर्वात वयस्कर आहे, तर पौडेल, दीपेंद्र सिंग ऐरी आणि आरिफ शेख हे मधल्या फळीतील महत्त्वाचे खेळाडू २५ वर्षांच्या आसपासचे आहेत. तथापि, फिरकी गोलंदाजी हा संघाचा मुख्य आधारस्तंभ आहे, आणि जगभर खेळणारा लेग-स्पिनर संदीप लामिछाने हा या संतुलित फिरकी गोलंदाजी विभागातील सर्वात प्रसिद्ध खेळाडू आहे.

एकदिवसीय क्रिकेटमधील त्यांच्या अस्थिर कामगिरीच्या तुलनेत, गेल्या विश्वचषकापासून नेपाळ संघ टी-२० फॉर्मॅटमध्ये एक उदयोन्मुख शक्ती म्हणून उदयास आला आहे. या स्पर्धेच्या तयारी दरम्यान, त्यांनी नेदरलँड्स आणि यजमान स्कॉटलंडवर अटीतटीची लढत देत विजय मिळवले होते.

स्कॉटलंडच्या आव्हानात्मक परिस्थितीत विजय मिळवले. त्यानंतर शारजाहमध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध ऐतिहासिक मालिका विजय मिळवला. त्या मालिकेतील शेवटच्या सामन्यात वेस्ट इंडिजने मिळवलेला विजय हा गेल्या सहा महिन्यांत नेपाळने गमावलेला एकमेव सामना आहे, तर आशिया-ईएपी प्रादेशिक पात्रता फेरीत केवळ कतार आणि त्यांचे नियमित प्रतिस्पर्धी यूएई यांनीच त्यांना कडवी झुंज दिली. भारतात आल्यापासूनही संघ चांगल्या फॉर्ममध्ये दिसत आहे. त्यांनी मुंबई इलेव्हनविरुद्ध सराव सामन्यांमध्ये सलग विजय मिळवले आणि त्यानंतर पहिल्या अधिकृत सराव सामन्यात यूएईला सहज हरवले.

असा हा नेपाळचा संघ आज मुंबईतल्या खऱ्याखोऱ्या आणि दर्जेदार क्रिकेट रसिकांसमोर आपला खेळ पेश करणार आहे.

# भारत-पाकिस्तान सामन्याची आशा कायम

- आयसीसीसमोर तीन मागण्या
- १५ फेब्रुवारीला होणार सामना



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ मधील भारत-पाकिस्तान सामन्यावर अजूनही अनिश्चितेची छाया कायम आहे. या स्पर्धेत भारताविरुद्ध सामना खेळण्यास पाकिस्तानने नकार दिल्याची चर्चा रंगत आहे. मात्र, याबाबत पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने अद्याप आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकरिता कोणतीही अधिकृत लेखी माहिती दिलेली नाही. त्यामुळे १५ फेब्रुवारी रोजी बहुप्रतीक्षित भारत-पाकिस्तान सामना होण्याची शक्यता अद्याप जिवंत आहे.

टी-२० विश्वचषक २०२६ मधील सर्वात मोठा सामना घडवून आणण्यासाठी आयसीसीकडूनही जोरदार प्रयत्न सुरू आहेत. रविवारी, ८ फेब्रुवारी रोजी आयसीसी आणि पीसीबी अध्यक्ष मोहसिन नक्वी यांच्यात महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे अध्यक्षही उपस्थित होते.

या बैठकीत पाकिस्तानने भारताविरुद्धचा बॉयकॉट मागे घेण्यासाठी आयसीसीसमोर तीन मोठ्या अटी ठेवल्या आहेत. मात्र, यापैकी एक अट भारत कधीही मान्य करणार नाही, असे स्पष्ट चित्र आहे. पीसीबी अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी आयसीसीसमोर पुढील तीन मागण्या मांडल्या आहेत.

पाकिस्तानची दुसरी मागणी म्हणजेच भारतासोबत द्विपक्षीय क्रिकेट मालिका पुन्हा सुरू करण्याची भारतासाठी पूर्णपणे अमान्य आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात शेवटची द्विपक्षीय मालिका २०१२ साली खेळली गेली होती. गेल्या १६ वर्षांपासून राजकीय तणावामुळे दोन्ही संघ केवळ आयसीसी स्पर्धांमध्येच एकमेकांसमोर येत आहेत.

मागील वर्षी भारतात झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानविरोधातील भारताची भूमिका अधिकच कठोर झाली आहे. या घटनेनंतर आशिया कप २०२५ पासून भारतीय संघाने पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन करणेही बंद केले आहे. पाकिस्तानच्या उर्वरित दोन मागण्या कदाचित चर्चेच्या पातळीवर मान्य झाल्या, तरी द्विपक्षीय मालिका पुन्हा सुरू होण्याची शक्यता अत्यंत कमी असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

**पाकिस्तानच्या अटी**

- आयसीसीकडून पाकिस्तानला अधिक महसूल वाटा द्यावा.
- भारत आणि पाकिस्तानदरम्यान पुन्हा द्विपक्षीय क्रिकेट मालिका सुरू करावी.
- टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन करावे.
- दुसरी मागणी भारताला मान्य नाही.

## नरसिंह यादव दंगल लीगचे अजिंक्यपद महाराष्ट्राकडे



। मुंबई । प्रतिनिधी ।

अर्जुन पुरस्कार विजेते व ऑलिम्पियन नरसिंह यादव (पोलीस उपायुक्त, मुंबई) यांच्या संकल्पनेतून आणि नरसिंह फाऊंडेशन तसेच नागरिक संरक्षण दल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नरसिंह यादव दंगल लीग स्पर्धेत महाराष्ट्र संघाने विजयी झेंडा फडकावला. विलासराव देशमुख मैदान, लोखंडवाला, कांदिवली (पूर्व), मुंबई येथे झालेल्या या एकदिवसीय कुस्ती लीगमध्ये महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि पंजाब या देशातील चार बलाढ्य कुस्ती राज्यांचे संघ सहभागी झाले होते. प्रत्येक संघातून ५ पुरुष व २ महिला अशा एकूण ७ खेळाडूंनी सहभाग घेतला असून, स्पर्धेत एकूण २८ कुस्तीपटूंनी आपली ताकद आजमावली.

स्पर्धेची सुरुवात हरियाणा व पंजाब यांच्यातील चुरशीच्या सामन्याने झाली. या लढतीत हरियाणाच्या ५ कुस्तीपटूंनी विजय मिळवला, तर पंजाबच्या २ कुस्तीपटूंनी बाजी मारली. परिणामी पहिला सामना हरियाणा संघाने जिंकला. दुसऱ्या सामन्यात उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र यांच्यात रंगतदार सामना झाला. महाराष्ट्राच्या ४ कुस्तीपटूंनी विजय मिळवत संघाला आघाडी मिळवून दिली, तर उत्तर प्रदेशच्या ३ कुस्तीपटूंनी विजय मिळवला. या सामन्यात महाराष्ट्र संघ विजयी ठरला.

अंतिम सामन्यात महाराष्ट्र आणि हरियाणा आमनेसामने आले. महाराष्ट्रच्या पृथ्वीराज पाटील, रविराज चव्हाण, आदर्श पाटील, अमृता पूजारी आणि सोनाली मंडलिक या पाच कुस्तीपटूंनी शानदार विजय मिळवला, तर हरियाणाच्या अंकुश सागर दहिया आणि कुसुम दहिया यांनी आपापले सामने जिंकले. अंतिम फेरीत महाराष्ट्रने ५-२ असा विजय मिळवत नरसिंह यादव दंगल लीगचे चॅम्पियनपद पटकावले.

## तायक्कांदोत ६०० खेळाडू सहभागी

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

रत्नागिरी तायक्कांदो स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने आयोजित १९ व्या जिल्हास्तरीय खुल्या तायक्कांदो आणि पुमसे स्पर्धेला खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मारुती मंदिर येथील जिल्हा क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातून सुमारे ६०० स्पर्धक आपले कौशल्य पणाला लावत आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राज्य संघटनेचे कोषाध्यक्ष तथा जिल्हा अध्यक्ष व्यंकटेश करारा, जिल्हा उपाध्यक्ष विश्वदास लोखंडे, खजिनदार शशांक घडशी, मयूर धुळप, डॉ. प्रियांका कांबळे आणि सोनाली आयरे प्रामुख्याने उपस्थित होते.

## ऋतुजा-पेंगतारणचे आव्हान संपुष्टात

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या वतीने आयोजित एल अँण्ड टी मुंबई ओपन डब्ल्यूटीए १२५ के डॉलर महिला टेनिस स्पर्धेत मुख्य ड्रॉच्या दुसऱ्या फेरीत एकेरीत चीनच्या फेंग्रान तियान हिने मानांकित खेळाडूंवर विजय मिळवत आजचा दिवस गाजवला.




मुंबई येथील एमएसएलटीएच्या टेनिस कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉच्या दुसऱ्या फेरीत संघर्षपूर्ण लढतीत चीनच्या फंग्रान तियान हिने चौथ्या मानांकित बेलारूसच्या हॅनी वंदीविकलचा तीन सेटमध्ये पराभव करून आगेकूच केली. सामना २ तास ३० मिनिटे चालला. ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेत मुख्य ड्रॉमधील सहभागी खेळाडू थायलंडच्या पाचव्या मानांकित लानलाना तारारुडी हिने कोरियाच्या सोह्यून पार्कचे आव्हान मोडीत काढले. हा सामना रतास ४मिनिटे चालला. केवळ १७ वर्षीय ऑस्ट्रियाच्या सातव्या मानांकित लिली टॅगीर हिने जपानच्या इरी शिमिजूचा सहज पराभव करून उपांत्यपूर्व फेरी गाठली. २०२५ मधील ज्युनियर रोलँड गॅरो स्पर्धेतील विजेत्या लिली समोर दुसऱ्या मानांकित २०२४ मधील एल अँण्ड टी मुंबई ओपन स्पर्धेतील विजेत्या दर्जा सेमेनिस्तजाचे कडवे आव्हान असणार आहे.

## पॉवरलिफ्टिंगमध्ये रोनकला सुवर्णपदक

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात अकरावी विज्ञान विभागात शिक्षण घेत असलेल्या रोनक रोशन जितेकर या विद्यार्थ्याने महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांच्या वतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत १०५ किलो वजनी गटातील पॉवरलिफ्टिंग या क्रीडाप्रकारात सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. महाराष्ट्रातील नामांकित क्रीडासंकुलांना मागे टाकत रोनक जितेकर याने हे दैदिप्यमान यश संपादन केले आहे. यासोबतच राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची महाराष्ट्राचा प्रतिनिधी म्हणून निवडही झाली आहे. रोनकच्या या सुवर्ण कामगिरीबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, विकास देशमुख, रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन बाळाराम पाटील, महेंद्र घरत, अरुण भगत आदी मान्यवरांनी विशेष कौतुक केले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रमेश म्हात्रे, उपप्राचार्य प्रो. डॉ. लक्ष्मण गवळी, जिमखाना कमिटीचे चेअरमन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान विभागाच्या इंचार्ज प्रा. सुनिता काटकर, कला विभागाच्या इंचार्ज प्रा. ललिता अवचिते व वाणिज्य विभागाचे इंचार्ज प्रा. सतीश ढगे, क्रीडाशिक्षक संभाजी बढे व जिमखाना कमिटीतील सर्व सदस्यांनी त्याचे अभिनंदन केले.



## स्कॉटलंडचा इटलीवर विजयी

। कोलकाता । वृत्तसंस्था ।

सध्या सुरु असलेल्या टी-२० विश्वचषकातील सातवा सामना इटली आणि स्कॉटलंड क्रिकेट संघात खेळवण्यात आला. या सामन्यात स्कॉटलंडनं निर्विवाद वर्चस्व राखत इटलीचा ७३ धावांनी पराभव केला. इटलीकडून सामन्यात २८ वर्षीय बेंजामिन मॅनेटीनं अर्धशतक झळकावलं, तो टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात अर्धशतक झळकावणारा पहिला इटालियन फलंदाज ठरला. मात्र, त्याचं अर्धशतक संघाला जिंकण्यास मदत करु शकलं नाही. स्कॉटलंडने दिलेल्या २०८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, इटलीला पूर्ण २० षटकंही पूर्ण करता आली नाहीत. त्यांचा डाव १६.४ षटकांत संपुष्टात आला. संघाचा कर्णधार वेन मॅडसेन दुखापतीमुळे आधीच सामन्यातून बाहेर पडला होता. परिणामी, इटलीला एका फलंदाजाची कमतरता भासत होती. इतिहासात आपलं नाव कोरलेल्या बेंजामिन मॅनेटीनं इटलीच्या संघासाठी सर्वाधिक धावा केल्या. मॅनेटी बंधूंच्या खेळीनंतरही इटलीला जिंकता आला नाही सामना : बेंजामिन मॅनेटीनं १६७.७४ च्या स्ट्राईक रेटनं ३१ चेंडूत ५२ धावा केल्या. त्याच्या खेळीत पाच चौकार आणि एक षटकार होता. इटलीचा दुसरा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बेंजामिन मॅनेट्टीचा धाकटा भाऊ हॅरी मॅनेट्टी होता. त्यानं २५ चेंडूत १४८ च्या स्ट्राईक रेटनं ३७ धावा केल्या, ज्यात तीन षटकारांचा समावेश होता. मात्र, मॅनेट्टी बंधूंचा डाव स्कॉटलंडच्या पराभवासाठी पुरेसा महत्त्वाचा ठरला नाही.

## कर्नाटकचा उपांत्य फेरीत प्रवेश

। मुंबई । प्रतिनिधी ।

लोकेश राहुलने पुन्हा एकदा स्वतःला संकटमोचक म्हणून सिद्ध केले आहे. ३२५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना कर्नाटकने महत्त्वाच्या विकेट्स गमावल्या, तेव्हा मुंबईच्या गोलंदाजांसमोर लोकेश भींत म्हणून उभा राहिला. त्याच्या शतकी खेळीच्या जोरावर कर्नाटकने रणजी करंडक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. कर्णधार सिद्धेश लाडने दिलेले जीवदान लोकेशच्या पथ्यावर पडले आणि त्याने मॅच विनिंग शतक झळकावले. श्रेयस गोपळ (३-४), एम प्रसिद्ध (३-२१) आणि विद्वथ कावेरप्पा (३-३८) यांनी मुंबईचा पहिला डाव १२० धावांवर गुंडाळून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. मुंबईकडून पहिल्या डावात अखिल हेरवाडकरने सर्वाधिक ६० धावा



केल्या होत्या. प्रत्युत्तरात मुंबईच्या गोलंदाजांनीही दम दाखवला आणि कर्नाटकला १७३ धावांवर गुंडाळले. मोहित अवस्थि व तुषार देशपांडे यांनी प्रत्येकी ४ विकेट्स घेतल्या. कर्नाटकडून मयांक अग्रवालने ९२ धावांची उल्लेखनीय खेळी केली. आकाश आनंद (७०), मुशीर खान (४९), तनुष कोटियन (नाबाद ४८) आणि तुषार देशपांडे (४७) यांच्या खेळीने मुंबईला दुसऱ्या डावात ३७७ धावा करता आल्या. मुंबईने कर्नाटकसमोर ३२५ धावांचे लक्ष्य ठेवले. शिखर शेट्टीने ३, तर विद्याधर पाटील व विद्वथने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना मयांक अग्रवाल ३ धावांवर शार्दूल ठाकूरच्या गोलंदाजीवर बाद झाला. कर्णधार देवदत्त पडिक्कल (३९) व करुण नायर (१२) हेही अपयशी ठरले. अशात लोकेश राहुल व स्मरण आर ही जोडी मैदानावर उभी राहिली. त्यांनी १६९ चेंडूत १४७ धावांची भागीदारी केली. लोकेश १८२ चेंडूत १४ चौकार व १ षटकारासह १३० धावांची खेळी केली.

## पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत देवगड प्रशालेचे यश

। देवगड । वृत्तसंस्था ।

क्रीडा युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा परिषद सातारा यांच्या वतीने सातारा येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत येथील शेठ म. ग. हायस्कूलमधील विद्यार्थिनींनी यश मिळविले. स्पर्धेत वेदा साटम हिने प्रथम क्रमांक पटकावला. तिची राष्ट्रीय स्तरासाठी निवड झाली आहे. तसेच शमिका वाडकर हिने द्वितीय क्रमांक मिळविला. या यशाबद्दल मुख्याध्यापक प्रवीण खडपकर, पर्यवेक्षिका निशा दहिबावकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थिनींना प्रशिक्षक गणेश वायंगणकर, संजय साटम, क्रीडा शिक्षक सुरेश पवार यांचे मार्गदर्शन व पालकांचे सहकार्य लाभले

**किशोरींचे सलग आठवे विजेतेपद | किशोरांनी जिंकले कांस्यपदक**

# कुरुक्षेत्रात महाराष्ट्राचा सुवर्णइतिहास

। हरियाणा । वृत्तसंस्था ।

कुरुक्षेत्र (हरियाणा) येथे सुरू झालेल्या ३५ व्या किशोर व किशोरी राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या किशोरी संघाने विजेतेपद पटकावत सलग आठव्या अजिंक्यपदाची ऐतिहासिक नोंद केली. या स्पर्धेत इला पुरस्कार महाराष्ट्रच्या अपर्णा वर्देने, तर भरत पुरस्कार ओडिसाच्या सत्या राजन बेहरने पटकावला. सलग नऊ वेळा अजिंक्यपद जिंकणाऱ्या महाराष्ट्राच्या किशोर संघाला यंदा मात्र तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

हरियाणातील थीम पार्क मैदानावर झालेल्या किशोरी गटाच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्र संघाने राजस्थानवर एक डाव व १२ गुणांनी (२७-१५) दणदणीत विजय मिळवला. पहिल्याच आक्रमणात महाराष्ट्राने १७ गुणांची (२४-७) निर्णायक आघाडी घेतल्याने सामना पूर्णपणे एकतर्फी ठरला. महाराष्ट्राकडून राही पाटील (२.१० मि. संरक्षण व २ गुण), वेदिका तामखेडे (२.२० मि. संरक्षण व २ गुण), अपर्णा वर्दे (२.३५ मि. संरक्षण व २ गुण), ऋतुजा सुरवसे (१.५० मि. संरक्षण), पियुशा परमाळकर (१.४५ मि. संरक्षण) यांनी भक्कम कामगिरी करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.




राजस्थानकडून तुलसी (१.४० मि. संरक्षण), गुंजन (१.२० मि. संरक्षण व ४ गुण), राधिका (४ गुण) यांनी प्रतिकार केला; मात्र महाराष्ट्राच्या वेगवान खेळापुढे तो अपुरा ठरला.

किशोर गटाच्या अंतिम सामन्यात ओडिसाने कोल्हापूरचा एक डाव ७ गुणांनी (३१-२४) पराभव करत अजिंक्यपद पटकावले. ओडिसाकडून सत्यरंजन (२, १ मि. संरक्षण व ८ गुण), चिन्मय अम्रिता (१.१०, १.२० मि. संरक्षण व ४ गुण), अमरज्योती (१.१०, १ मि. संरक्षण व २ गुण) यांनी उत्कृष्ट अष्टपैलू खेळ साकारला. कोल्हापूरकडून देवराज येड्राव (६ गुण), गौरव माने (८ गुण) यांनी झुंज दिली; मात्र विजय ओडिसाच्याच पारड्यात गेला.

याआधी झालेल्या किशोर गटाच्या उपांत्य फेरीत ओडिसाने महाराष्ट्रावर ५ गुणांनी (३०-२५) मात केली. मध्यंतराला महाराष्ट्राकडे ५ गुणांची आघाडी होती; मात्र दुसऱ्या डावात ओडिसाच्या आक्रमक खेळामुळे सामना त्यांच्या बाजूने झुकला. ओडिसाकडून सत्या (१.१०, १.४० मि. संरक्षण व ४ गुण), चिन्मय (१.३० मि. संरक्षण व ६ गुण) यांनी निर्णायक खेळी केली. महाराष्ट्राकडून वरद पोळ (२.४०, २ मि. संरक्षण व २ गुण), कर्तव्य गादेकर (१.५० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी लढत दिली. या पराभवानंतर महाराष्ट्राला तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले.

**वैयक्तिक पारितोषिके**

- उत्कृष्ट संरक्षक : राही पाटील (महाराष्ट्र)
- उत्कृष्ट आक्रमक : गुंजन (राजस्थान)
- इला पुरस्कार व अष्टपैलू खेळाडू : अपर्णा वर्दे (महाराष्ट्र)
- किशोर गट :
- उत्कृष्ट संरक्षक : वरद पोळ (महाराष्ट्र)
- उत्कृष्ट आक्रमक : गौरव माने (कोल्हापूर)
- भरत पुरस्कार व अष्टपैलू खेळाडू : सत्या राजन बेहर (ओडिसा)

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)